# मद्राशीने केला मराठी भ्रतार

वसन्त कानेटकर



MR
891.462
K131 M

Madrashine Kela
Marathi Bhratar

# मद्राशीने केला
# मराठी भ्रतार

Vasant Kanetkar

वसन्त कानेटकर

Popular

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

Bombay

CATALOGUED

या नाटिकेच्या प्रयोगाचे, भाषांतराचे, चित्रपटाचे सर्व हक्क सौ. उषा वसन्त कानेटकर यांच्या स्वाधीन आहेत. आगाऊ लेखी परवानगीशिवाय या नाटिकेचा कोणीही प्रयोग करू नये. प्रयोग करू इच्छिणाऱ्यांनी तालमींना आरंभ करण्यापूर्वी सौ. उषा वसन्त कानेटकर, 'शिवाई', शरणपूर रोड, नाशिक ४२२ ००२ या पत्त्यावर परवानगी घेणे आवश्यक आहे.

पॉप्युलर प्रकाशन
म–२६२

© वसन्त कानेटकर

पहिली आवृत्ती १९६९
दुसरी आवृत्ती १९७५

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ४०० ०३४

MR
891.462
K131 M

55478
16.11.76

Library IIAS, Shimla
MR 891.462 K 131 M
00055478

# मद्राशीने केला मराठी भ्रतार

[ मुंबई. शीव-माटुंग्याच्या परिसरातील एका आडरस्त्यावर उभी असलेली " श्री सद्गुरू साईबाबा कृपा "– हे इमारतीचे नाव. तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट. बाहेर गच्ची– गच्चीवर खिडकीतून दिसणारी भली मोठी अवजड लोखंडाची टाकी वगैरे. जन्मसिद्ध हक्कानेच आले की येथे मालक राहतात. जांबुवंतराव जकातदार. उपनगरातील कोठल्याशा रेल्वे स्टेशनचे ए. एस. एम्. म्हणजे असिस्टंट स्टेशन मास्टर शिवाय त्यांच्या सौभाग्यवती मनकर्णिकाबाई आणि तरुण चिरंजीव किशनराव. यांचा हुद्दा इंजिन ड्रायव्हर– विजेच्या गाडीचे.

जांबुवंतरावांच्या फ्लॅटमधील दर्शनी हॉल. या हॉलची सजावट रेल्वे सर्वंटाच्या रसिकतेला साजेलशी आणि खिशाला परवडेलशी. फर्स्ट क्लास वेटिंगरूममधून उचलून आणल्यासारखी वाटावीत अशी दोन कपाटे, चार खुर्च्या आणि मधोमध लंबवर्तुळ टेबल– शिवाय एक आरशाचा स्टँड देखील.

सायंकाळचा समय. वाटोळ्या टेबलावर एक मोठी बॅग उघडून ठेवली आहे. टेबलावर काही कपडे आणि रेल्वे सर्वंटच्या व्यवसायाला लागणाऱ्या काही खास चिजा विखुरलेल्या दिसतात. पडदा वर गेल्यावर क्षणार्धातच खालच्या मजल्यावरून गलबला– संतापलेल्या बिऱ्हाडकरूंचा आरडाओरडा ऐकू येतो.

" वॉटर.... वॉटर... ओपन कॉक...इ." ऐकू येणाऱ्या शब्दोच्चारावरूनच बहुसंख्य बिऱ्हाडकरू मद्रदेशीय बांधव असावेत हे कोणीही

ओळखू शकेल. त्याच वेळी दारावर बेल खणखणते. तशी हातात हिरवा– तांबडा बावटा आणि स्टेशनमास्तर गाडीला दाखवतो तसला कंदील घेऊन सौ. मनकर्णिकाबाई आतल्या खोलीतून तरातरा येतात आणि हातातले बावटे आणि कंदील टेबलावर आपटीत त्रासिकपणे बड-बडतात... "माझी एक गडबड आणि या मेल्या भाडेकरूंची ज्यात-त्यात सद्दा तडफड. तरी मी यांना बजावत होते– बि-हाडं आपली ठेवा. चार पैसे पागडी कमी मिळाली तरी हरकत नाही. पण नाही. पैसा पाहिला, हुरळले आणि हे लुंगीवाले गोळा केले. आता वसाऽऽऽ..." तोच दारावरची बेल पुन्हा कर्कश खणखणते. तशी— किंचाळत– "आलेऽऽऽ", आणि दाराकडे जात म्हणतात– "मेल्यांची भाषा मला कळत नाही आणि माझं बोलणं त्यांच्या टाळक्यात शिरत नाही. हे बसले असतील स्टेशनवर झ्याकीत शिट्टी फुंकीत नाहीतर बावटा फडकावीत..." खाडकन दार उघडीत वसकन ओरडत– "व्हाट डू यू वॉऽऽन्ट ?"
तोच प्रवेशतो घरगडी रामा. साहेबांचा शुभ्र गणवेश कडक इस्त्री करून घेऊन. तशी– ]

**मनकर्णिका :** अय्याऽऽऽ रामा तू होय ?

**रामा :** ( कपडे बाईच्या हाती देत ) ह्यो तुमचा कपडा.

**मनकर्णिका :** ( खुलून कपडे हाती घेत ) चांगली नीट कडक इस्त्री केली आहे ना रे ?

**रामा :** हां बाई– एकदम फर्श क्लास....वाइच बटनं तुटल्याती–

**मनकर्णिका :** ( किंचाळत ) बटणं तोडलीऽऽऽ ? धोब्यानंऽऽऽ ?

**रामा :** धोब्यानं नवं– सायेबांनीच...आता कापडं अंगाला येत न्हाईत तर–

**मनकर्णिका :** आणि हे हे कपडे बटणाशिवाय मी घालू ?

**रामा :** त्येला काय जालं ? पिन नायतर टाचणी लावायची. सायेब असंच करत्यात.

**मनकर्णिका :** शहाणाच आहेस ! मला नाटकात उभं राहायचंय ऑडियन्ससमोर —तुझ्या साहेबांच्यासारखं स्टेशनावर नाही जायचं बावटा फडकवायला.

**रामा** : गनपतीम्होरचं नाटक. त्यो काई कंपनीचा खेळ हाय ?

**मनकर्णिका** : ( रागाने ) बरं बरं— तू नको मला शहाणपणा शिकवू....( कपडे उलगडून पाहत ) बाई बाई—काऽऽय हे ? अस्से कपडे घालून जातात रोज हे ?

**रामा** : तर काय बाई .... रेल्वेची कापडं .... कंदी बी कुनाच्या अंगा बेतशीर होत्याल ?

**मनकर्णिका** : ( चुकचुकत ) आता मांडवात गेल्यावर चिटणिसांना शिंपीच पकडून आणायला हवा.

**रामा** : तसं कशापाई ? म्या—

[ तोच खालून बिऱ्हाडकरूचा पुन्हा गलबला. तशी— ]

**मनकर्णिका** : जळलं मेल्यांचं लक्षण ते—

**रामा** : बाई— खालच्या मजल्याचं मद्राशी बिराडकरू कोकलत्यात तुमच्या नावानं.

**मनकर्णिका** : ( उसळून ) काऽऽऽ ? आम्ही काय घोडं मारलंय त्यांचं ?

**रामा** : म्हनत्यात— आपून वरून पान्याचा कॉक बंद केलात आन त्येंचं पानी अडिवलंत.

**मनकर्णिका** : बेशरम मेले— लाजा नाही वाटत त्यांना ?

**रामा** : आता पगा मंजी जालं.

**मनकर्णिका** : आता पाण्यालाच प्रेशर नाही हा काय आम्हा मालकांचा अपराध ? [ खालून आरडाओरडा.... "पानी....पानी....वॉटर....वॉटर.... ओपन कॉक...." तशी मनकर्णिकाबाई तरातरा खिडकीशी जात वाकून कडाडतात— ] कॉक ओपनच आहे— वाटल्यास कम आणि लुक.... ( माघारी फिरत ) माजोरी मेले.... तू तरी सांगायचं नाहीस रामा त्यांना— ?

**रामा** : म्या ? नाय रे बाबा. म्या त्वांड उगाडलं तर मला बी दम भरत्यात. म्हनत्यात— तुला बदडून काढू....

**मनकर्णिका** : ( आवेशाने ) खुदशाऽऽल ! काढाच म्हणावं बदडून.

**रामा** : लई ब्यास ! तुमचं काय जातंया ? मार मला खावा लागल.

**मनकर्णिका** : काय मोगलाई लागली आहे ही ? ही मुंबई आहे मुंबई म्हणावं. मद्रास नव्हे. मिजास तिकडं करा. इथ्थं मुंबईला येऊन कशाला तडफडलात ?

**रामा** : तर काय बाई— पगा मंजी जालं !

**मनकर्णिका :** मारायची धमकी देताहेत म्हणे. अंगाला हात लावून तर पाहा– म्हणावं....

**रामा :** त्ये तुमीच म्हना एकदा.... त्येंच्या म्होरं....

**मनकर्णिका :** (उसळून) म्हणेन.... म्हणेन.... काय भिते आहे काय मी? आमच्या राज्यात येऊन आम्हालाच दमदाटी करतात की काय हे मद्रासी? [तोच पुन्हा एकदा खालून गलबला आणि आरडाओरडा वाढतो आणि त्याच वेळी दारावर कर्कश बेल खणखणते– तशी रामा घाबरून टेबलाखाली शिरतो. ते पाहून–] अरे– पुरुषासारखा पुरुष तू– तू या मद्राशांना घाबरतोस? हो पुढं आणि उघड दार–

**रामा :** (टेबलाखालून) न्हाई जमायचं त्ये–

**मनकर्णिका :** (वेडावून) अहाहाऽऽऽ! भित्री भागूबाई! बांगड्या भर हातांत बांगड्या. [चटकन आत जाऊन धुणं वाळत घालायची काठी घेऊन येतात आणि धावत जाऊन आवेशाने दार उघडत–] व्हाट डू यू वॉऽऽन्ट? कॉक इज ओपन.... वाटल्यास कम अँड लुक.... [तोच दारातून आत डोकावते— घाबरलेली एक मद्रदेशीय, काळीसावळीच पण सुस्वरूप तरुणी– रुक्मिणी....]

**रुक्मिणी :** (भेदरून) नो नो.... आय वॉंट....

**मनकर्णिका :** (खसकन तिचा हात धरून ओढून दुसऱ्या एका खिडकीशी नेत) तसं नाही.... कम इन.... (खिडकीशी नेत) सी वुइथ युवर आईज.... सी ....सीऽऽना.... पटली खात्री?

**रामा :** (गडबडीने टेबलाखालून बाहेर येत त्यांच्यांत घुसून खिडकीतून पाहत) कॉक इज ऑन. हाय का न्हाई ऑन? उगाच येखाद्याला दम भरायचा मंजी काय? आता पान्याला प्रेशरच न्हाय तर–

**रुक्मिणी :** (भेदरून दूर होत) येस.... येस.... बट.... बट.... आइ वॉंट.... आइ वॉंट....

**रामा :** (डोक्यात उजेड पडून) हाऽऽऽमंजी किशनराव व्हंय? मग तसं बोला की. त्ये न्हाइती घरामंदी....

**मनकर्णिका :** (आश्चर्याने किंचाळत) व्हॉऽऽऽट? रामाऽऽऽऽ

**रामा :** अदूगर त्येनला येसफेस करून सांगा– किशनराव घरामंदी न्हाइती....

इगतपुरीला गेल्याती....इंजिनावर बसून....

**मनकर्णिका :** (बावचळून किंचाळत) किशन ? (तिला आपादमस्तक न्याहाळीत) यू वॉन्ट किशन ?

**रुक्मिणी :** येस येस किशन....

**मनकर्णिका :** किशन गॉन टू इगतपुरी— ऑन इंजिन....

**रुक्मिणी :** अय्यय्योऽऽऽ गॉन टू इगतपुरी ?

**रामा :** ऑन इंजिन बसून....

**रुक्मिणी :** (थबकून....माघारी फिरत) आय कम अगेन.... (जाऊ लागते तशी—)

**मनकर्णिका :** (कडाडत) स्टॉप. (रामाकडे वळून) रामा, विचार तिला— किशनकडं काय काम आहे तिचं ?

**रामा :** आता त्येनला तुमची बाशा बी समजंना तर म्या—

**मनकर्णिका :** तू म्हणजे असा रड्या आहेस— (रुक्मिणीला) युवर नेम ?

**रुक्मिणी :** (लाजून) यस्टरडे रुक्मिणी.... टुडे राधा....

**मनकर्णिका :** (थक्क होत) यस्टरडे रुक्मिणी— टुडे राधा.... म्हणजे ? काल रुक्मिणी, आज राधा ? काय भानगड आहे ही ?

**रामा :** माजी काय बी भानगड न्हाय. इचरा की त्येनलाच.

**मनकर्णिका :** (रुक्मिणीला) डू यू कम मराठी ?

**रुक्मिणी :** (गडबडून) नो....नो.... ओन्ली लिटल लिटल इंग्लिश... बट नो मराठी....तामिळम्....दोरास्वामी दोरास्वामी....

**मनकर्णिका :** (आश्चर्याने) दोरास्वामी ? दोरास्वामी अय्यंगार ? म्हणजे यांच्या स्टेशनवरचे उडपी रेस्टॉरंटचे मालक ?

**रुक्मिणी :** येस येस.... आय हिज डॉटर.

**मनकर्णिका :** (किंचाळत) दोरास्वामीची तू डॉटऽऽऽर ? अय्या (तिच्या गळ्यातल्या मंगळसूत्राकडे पाहत) मॅरीऽऽऽड ?

**रुक्मिणी :** (एकदम लाजून मुरका मारीत) अय्ययोऽऽऽ ! [पळून जाते.]

**मनकर्णिका :** (थक्क होत—प्रक्षोभाने) रामा, व्हॉट इज धिस ?

**रामा :** आं ?

**मनकर्णिका :** आं काय ? दोरास्वामीची ही मुलगी—ही रुक्मिणी का राधा कोण

आहे ती इथं मुंबईत कधी आली ?

**रामा** : जालं असत्याल दोन अडीच महिनं.

**मनकर्णिका** : सांगतोस काय तू ? दोन अडीच महिने ? खालच्या मजल्यावर दोरास्वामीच्या घरात राहते ही ?

**रामा** : तर काय ?

**मनकर्णिका** : आणि आम्हाला आजपर्यंत पत्ता देखील नाही ?

**रामा** : या म्हमईत कुनाला पत्त्या तरी लागतो का बाई ?

**मनकर्णिका** : नवरा कुठं असतो या मुलीचा ?

**रामा** : नवरा ? हॅ हॅऽऽऽ इतक्त्यात कुठला आलाय नवरा ? पोरगी उजवायापाई तर दोरास्वामी घेऊन आलं इथं. रोज कुटं कुटं दाखवाया नेत्याती.

**मनकर्णिका** : काय धोत्राबित्रा प्यालास की काय तू ? गळ्यात मंगळसूत्र पाहिलं नाहीस तिच्या ?

**रामा** : मंगळसूत्र ? न्हाय बा —पर असं कसं व्हईल ?

**मनकर्णिका** : ते मलाच विचार.

**रामा** : न्हाइ मंजी– कालपरवा पोत्तूर लगीन जालं नव्हतं बाईचं. आता कुणी घरातलाच योक लुंगीवाला गटवला का काय बाबानं ठावं न्हाय.

**मनकर्णिका** : घरातला ?

**रामा** : तर काय– दोरास्वामीच्या बिराडात रोजच्या धा लुंग्या धुवाया लागत्यात मला.

**मनकर्णिका** : ( चकित होऊन ) दोरास्वामीच्या बिऱ्हाडात दहा मद्रासी राहतात ? बाइ बाइ बाई !

**रामा** : ऱ्हातात मंजी झोपाया येत्यात. दिसभर भाहीरच असत्यात नवं ?

**मनकर्णिका** : अरे चोराऽ ऽ ! कसा लुच्च्या आहे हा दोरास्वामी पाहिलंस ? आम्हाला न कळवता घरात पोटभाडेकरू ठेवले !

**रामा** : आपल्या किशनरावांची लई दोस्ती हाय.

**मनकर्णिका** : कुणाशी–? त्या लुंगीवाल्यांशी ?

**रामा** : नव्हं नव्हंऽऽऽ मघा आलेल्या बाईशी...

**मनकर्णिका** : ( थक्क होत ) क....क....काऽऽय ? किशनची रुक्मिणीशी दोस्ती ?

**रामा** : आईच्यान....

**मनकर्णिका :** त्याला ही कुठं भेटली ?

**रामा :** जिन्यात.

**मनकर्णिका :** ( किंचाळत ) जिन्या ऽऽऽ त ?

**रामा :** तर काय ? दोगं बी जिन्यात तासन् तास बोलत हुभं ऱ्हातात नवं....

**मनकर्णिका :** ( मटकन बसत ) तासन् तास बोलत उभे राहतात ? कोणत्या भाषेत ?

**रामा :** आता वाद्या कशाला होवी ? काय बी येस फॅस करीत बोलायचंच की–

**मनकर्णिका :** थापा मारू नकोस. चार इयत्ता धड शिकला नाही गधडा म्हणून यांच्या वशिल्यानं इंजिन ड्रायव्हर केला. तो तिच्याशी येस फॅस करीत बोलतो म्हणून तू मला सांगतोस ?

**रामा :** आता इचारा की आख्ख्या बिल्डिंगीला– आपून दोगं घरात नसला की ती दोगं—

**मनकर्णिका :** ( दटावीत ) कळलंऽऽ ! ते कपडे घडी करून बॅगेत ठेव आधी.

**रामा :** ( टेबलावरील कपडे बॅगेत भरीत ) ठिवतो....आपून कुनाच्या भानगडीत कंदी बी पडत ऱ्हाय.

**मनकर्णिका :** समजलंऽऽ ! यांची शिट्टी कुठाय ? टोपी कुठाय ? [ त्याच वेळी उघड्या दारातून जांबुवंतराव प्रवेशतात आणि– ]

**जांबुवंतराव :** ( टोपी आणि शिट्टी काढून देत ) ही टोपी. ही शिट्टी. मनकर्णिके तुला सांगतो, आमच्या डी. टी. एस. नं त्या दोरास्वामीची आज—

**मनकर्णिका :** ( उसळून टोपी, शिट्टी हिसकावीत ) डी. टी. एस. गेला खड्ड्यात नि दोरास्वामी गेला मशणात. ही काय यायची वेळ झाली ? तिकडं आठाला नाटक सुरू होणार. सात वाजले. सगळ्यांचा मेकअप देखील झाला असेल. आणि मी—

**जांबुवंतराव :** अहो...अहो पण....पण म्हणजे गणेशोत्सवातलंच नाटक ना ? झाला थोडाफार उशीर तर–

**मनकर्णिका :** ( वसकन ) तुमच्या डी. टी. एस. ला सांगाल का हे ? आहे हिम्मत ?

**जांबुवंतराव :** ( हबकून ) चुकलंऽऽ कबूल....

**मनकर्णिका :** ( फणफणत ) म्हणे कबूल. काय कबूल ? या युनिफॉर्मच्या सगळ्या

गुंड्या तोडल्यात.

**जांबुवंतराव** : आता शिंप्यानं मापं घेताना गोंधळ केला आणि दोरा कच्चा वापरला तर—

**मनकर्णिका** : पण आधी का बोलला नाहीत ? आता नाटकाच्या वेळी मी काय हा हा असला युनिफॉर्म घालून स्टेजवर जाऊ ?

**जांबुवंतराव** : वाटल्यास माझा नाइट ड्यूटीचा काळा युनिफॉर्म घेऊन चला. त्याच्या सगळ्या गुंड्या—

**मनकर्णिका** : अहाहा—सीन दिवसाचा आणि युनिफॉर्म रात्रपाळीचा घालू ? आडियन्स——

**जांबुवंतराव** : हत्तेच्या. सीन बदला—रात्रीचा करा. आहे काय त्यात ?

**मनकर्णिका** : तर तर—सीन बदलायचा म्हणजे ड्यूटी नाही बदलून घ्यायची.

**जांबुवंतराव** : पण मी काय म्हणतो——

**मनकर्णिका** : आणि तो युनिफॉर्म आता ऐनवेळी येईल तरी का माझ्या अंगाला ?

**जांबुवंतराव** : मग हा हा तरी तुमच्या अंगाला कसा येणार होता ?

**मनकर्णिका** : तो घेतला होता मी कापून छाटून. पण मला काय माहीत की, त्याच्या गुंड्या——

**जांबुवंतराव** : (किंचाळत) कापून छाटून ? (कपडे उलगडून पाहत) म्हणजे तुम्ही हा युनिफॉर्म——

**मनकर्णिका** : (कपडे हिसकावून घेऊन बॅगमधे घालीत) उगाच ओरडू नका. थोडेसे हातपाय लांडे केले म्हणजे काही फाडून नाही टाकला.

**जांबुवंतराव** : अग पण उद्या डी. टी. एस. समोर—

**मनकर्णिका** : जा घालून तो काळा युनिफॉर्म. एखाद दिवस घातलात तो तर काही शान जायची नाही.

[तोच खालून पुन्हा एकदा गलबला, आरडाओरडा—]

**जांबुवंतराव** : पुन्हा काय भानगड झाली ? अग पाण्याचा नळ खुला करून टाक ना ! का उगाच बिऱ्हाडकरूंचा अंत बघते आहेस ?

**मनकर्णिका** : काहीतरी उगाच बडबडू नका. नीट जाऊन डोळे उघडून बघा. कॉक खुला आहे.

**जांबुवंतराव** : ( खिडकीशी धावून जात पाहत ) कॉक खुला आहे ? खरंच की. मग पाणी कसं नाही ? रामाऽऽऽ काय भानगड आहे ही ?
**रामा** : आपली भानगड काय बी न्हाय. टाकीत ट्यूब टाकूनशान आपली पिपं गच्च भरूनशान ठेवल्याती. ठिपूसबर पानी ठिवलं न्हाय म्या टाकीमंदी...
**जांबुवंतराव** : ( कपाळावर हात मारीत ) हा शहाणपणा कुणी शिकवला तुला ?
**रामा** : ( थंडपणे ) बाईनी.
**मनकर्णिका** : ( बॅगमधे सगळे कपडे, वस्तू भरून बॅग मिटवीत ) बघताय काय डोळे मोठ्ठे करून माझ्याकडं ? आपण मालक. मालकांना पाणी नको ?
**जांबुवंतराव** : हवं की ! तुम्ही धरण—पाटबंधारे मंत्रीच व्हायच्या—ते चुकून स्टेशनमास्तरच्या घरात पडलात—
**मनकर्णिका** : ( डोळे वटारीत ) कळलंऽऽ ! रामा, ती बॅग उचल आणि टॅक्सी घेऊन ये आधी.
**जांबुवंतराव** : अगं पण आमचं जेवणखाण काही—
**मनकर्णिका** : पानं मांडून ठेवली आहेत दोघांची. किशन आला म्हणजे वाढून घ्या आणि जेवा. आणि रात्री घंटा वाजली की दार उघडा. नाहीतर पडाल ढाराढूर घोरत. काऽय ?
**जांबुवंतराव** : न....न....नाही. ते ठीक आहे ! पण किशन कुठं आहे ?
**मनकर्णिका** : कुठे आहे म्हणजे ? तेही मलाच विचारता ? इंजिनवरून इगतपुरीला ना गेलाय तो ? रामाऽऽ
**रामा** : असं जाताना सांगूनशान गेलं सायेब....
**जांबुवंतराव** : बरं वाटत नाही म्हणून चक्क रजेचा अर्ज पाठिवलान त्यानं— म्हणजे लोकोमोटिव्ह शेडचा तो हा आपला हा म्हणत होता—
**मनकर्णिका** : थापा. थापाच मारल्यान तुमच्या त्या शेडवाल्यानं. बॉयलर सूट घालून घरातून सकाळी बाहेर पडताना मी जर त्याला पाहिला तर—
**रामा** : तर काय ? टाळक्याला मेणचटलेला रुमाल बांदूनशान भाईर पडताना म्या बी पायलं की सायेबांना—
**मनकर्णिका** : ( आत्मविश्वासाने ) होय ना ? पटली खात्री ?
**जांबुवंतराव** : ( हबकून ) असेल असेल—( खिशातून चंची काढून पान जमवू लागतात. )

**रामा** : असंल कशापाई? आहेच! त्येंच्यासंगं दोरास्वामींची रुक्मिनीबाई बी व्हती. इचारा....इचारा की तिला...

**मनकर्णिका** : ( डोळे विस्फारीत ) रुक्मिणी? त्याच्याबरोबर? म्हणजे रुक्मिणीला घेऊन हा शहाणा इगतपुरीला गेला होता?

**जांबुवंतराव** : ( विस्मयाने ) काय भानगड आहे ही?

**रामा** : भानगड आपली काय वी न्हाय.

**मनकर्णिका** : ( दटावीत ) कळलंऽऽ! बॅग ठेव खाली. आधी टॅक्सी घेऊन ये. [ रामा पुटपुटत जातो. तो गेल्यावर—] गुण उधळायला सुरुवात केलीय— आपल्या किशनरावांनी

**जांबुवंतराव** : ( थक्क होत ) आंऽऽ?

**मनकर्णिका** : आं— काय? बापाचा आदर्श गिरवायला सुरवात केलीय चिरंजीवांनी...

**जांबुवंतराव** : ( पान तोंडात कोंबीत ) अगं अगं पण.... त्या वेळी तरुण होतो आम्ही...

**मनकर्णिका** : मग किशन काय म्हातारा झालाय?

**जांबुवंतराव** : पण गुण उधळले म्हणजे केलं काय या कारट्यानं?

**मनकर्णिका** : दोरास्वामीच्या लग्न झालेल्या लेकीशी सूत जुळवलंय त्यानं.

**जांबुवंतराव** : लग्न झालेल्या लेकीशी? म्हणजे रुक्मिणीशी....? हँ हँ.... काय वेड?

**मनकर्णिका** : मग वेड मलाच लागलंय. तासन् तास हा तिच्याशी जिन्यात गुलगुल गोष्टी करीत उभा असतो.

**जांबुवंतराव** : छा छा— शक्यच नाही. अग तिला मराठी येत नाही आणि याला तामिळी येत नाही. तासन् तास गुलगुल गोष्टी करायला— भाषा तरी एक असायला नको?

**मनकर्णिका** : मला तसंच वाटत होतं....पण रामा देखील म्हणाला—

**जांबुवंतराव** : रामा म्हणाला ना? त्याचं सोड ग—कुणाचं चांगलं झालेलं त्याला बघवतच नाही. वाट्टेल त्याच्याबद्दल वाट्टेल ते सांगत सुटतो तो. माझ्याबद्दल देखील तो सगळ्यांना गावभर सांगत हिंडतो की— जांबुवंतराव पैसे खातात.

**मनकर्णिका** : मग त्यात काय खोटं आहे?

**जांबुवंतराव :** तुझ्याबद्दल देखील तो सांगत हिंडतो की, या बाई मूर्ख लुच्च्या लुच्च्या आणि ढोंगी आहेत. बाईंना भाजीपाला आणून द्यावा आणि वाट्टेल ती कामं नवऱ्याकडून करवून घ्यावी.

**मनकर्णिका :** असं सांगत हिंडतो तो? अरे मेल्याऽऽऽ

**जांबुवंतराव :** यात काही नाही तरी—निदान फिफ्टी परसेंट तरी खोटं आहे ना?

**मनकर्णिका :** देवाशप्पथ... तुमच्या, माझ्या, किशनच्या गळ्या शप्पथ सांगते—सगळं सगळं खोटं होऽऽऽ—येऊ दे तर मेल्याला आता घरात म्हणजे—

**जांबुवंतराव :** हां हां हांऽऽहे तुझं चुकलं. इतक्यात त्याला काही बोलायचं नाही. कोठपर्यंत तो थापा मारतो आहे ते तर बघू!

**मनकर्णिका :** अहो पण—

**जांबुवंतराव :** तू म्हणालीस दोरास्वामीची लग्न झालेली मुलगी रुक्मिणी—खरं आहे?

**मनकर्णिका :** हो ना—मी चक्क—

**जांबुवंतराव :** कानांनी ऐकलंस. पण ते खोटं.

**मनकर्णिका :** अहो पण—

**जांबुवंतराव :** ऐकून ठेव. तू ऐकलंस ते खोटं.

**मनकर्णिका :** (किंचाळत) खोटंऽऽऽ?

**जांबुवंतराव :** (खिडकीत जाऊन पानाचा तोबरा थुंकत) साफ खोटं. आज संध्याकाळी घरी यायला उशीर झाला मला. का ठाऊक आहे? दोरास्वामीकडून खुद्द डी. टी. एस. नं पार्टी काढली. असा....कापला...असा कापला म्हणतेस त्याला—

**मनकर्णिका :** पण कशाबद्दल?

**जांबुवंतराव :** मुलीचं लग्न ठरल्याबद्दल.

**मनकर्णिका :** (किंचाळत) मुलीचं लग्न ठरल्याबद्दल? रु....रु....रुक्मिणीचं लग्न ठरल्याबद्दल?

**जांबुवंतराव :** (विजयाने) मग? कोणी तरी काही तरी तुला येऊन सांगतो आणि—

**मनकर्णिका :** (किंचाळत) शक्यच नाही. मी तिच्या गळ्यात मंगळसूत्र पाहिलंय. मघाशी—

**जांबुवंतराव :** (हसत) एखादा मद्रासीबिद्रासी दागिना असेल तो.

**मनकर्णिका :** (उसळून) काय बडबडताहात काय? मंगळसूत्र मला ओळखत नाही?

**जांबुवंतराव :** (चकारून) ऑँऽऽऽ? रुक्मिणीच्या गळ्यात तू मंगळसूत्र पाहिलंस? मघाशी?

**मनकर्णिका :** अगदी दहा-पंधरा मिनिटांपूर्वी....आणि रामा काय सांगत होता ठाऊक आहे?

**जांबुवंतराव :** (डोळे विस्फारून) क....क....काय सांगत होता?

**मनकर्णिका :** त्या दोरास्वामीच्या बिऱ्हाडात दहा लुंगीवाले मद्रासी पोटभाडेकरू ठेवले आहेत म्हणे त्याने.

**जांबुवंतराव :** ते सांगितलं होतं त्यानं मला.

**मनकर्णिका :** आणि ते ऐकून तुम्ही निमूटपणे गप्प बसलात?

**जांबुवंतराव :** गप्प का म्हणून? रोज मला आणि किशनला, सकाळ—संध्याकाळ, इडली—चटणी, मसाला डोसा, वडा—सांबार, उप्पीट, उपमा यांचा विनामूल्य खुराक चालू आहे— त्या दोरास्वामीच्या कॅंटीनवर. शिवाय वर म्हैसूर सुपारी— फुकट.

**मनकर्णिका :** आणि तरी तुम्ही दोघं घरी यथेच्छ जेवताऽऽऽ?

**जांबुवंतराव :** नको का जेवायला? एरवी तू आमची काय अवस्था केली असतीस?

**मनकर्णिका :** मग बरोबर आहे. रोजचं सकाळ—संध्याकाळ इतकं फुकटचं हादडून घरी यथासांग जेवण केल्यावर युनिफॉर्मच्या गुंड्या तुटतील नाही तर काय होईल?

**जांबुवंतराव :** हे हे तुझं बोलणं गैरलागू आहे. तू काही तरी वेगळंच सांगत होतीस. दोरास्वामीच्या बिऱ्हाडातील त्या लुंगीवाल्याबद्दल— रामा तुला काही तरी सांगत होता.

**मनकर्णिका :** (एकदम आठवून—खुलून) अहो सांगू का— (इकडे तिकडे बघतात तशी— )

**जांबुवंतराव :** सांग सांग— इथं कोणी नाही....

**मनकर्णिका :** अहो, त्या रुक्मिणीनं लग्न केलंय. काल परवाच.

**जांबुवंतराव :** ( थक्क होत ) ऑँऽऽऽ ? काल परवाच ?
**मनकर्णिका :** सीक्रेटली.
**जांबुवंतराव :** ( किंचाळत ) सीक्रेटलीऽऽऽ ?
**मनकर्णिका :** बिऱ्हाडातल्याच एका मद्राशाबरोबर.
**जांबुवंतराव :** ( थक्क होत ) काय म्हणतेस ? बिऱ्हाडातल्याच एका....धिस इज सीरियस....दोरास्वामीचं हार्ट फेल होईल ऐकल्यावर....
**मनकर्णिका :** त्याची नाही मला एवढी मेली काळजी. पण नवरा कामावर गेला की ही जगदंबा आपल्या किशनशी जिन्यात....जिन्यात बरं का जिन्यात, तासन् तास गुळूगुळू बोलत उभी राहते. आख्ख्या बिल्डिंगीनं पाहिलंय हे.
**जांबुवंतराव :** आं ? आपल्या किशनशी.... ? जिन्यात ? तासन् तास... ? अरेच्च्याऽऽऽ हा किशा बराच तयार झाला की एवढ्यात !
**मनकर्णिका :** आपलेच चिरंजीव— पराक्रम काय तो यातच.
**जांबुवंतराव :** पण त्या रुक्मिणीची तरी हद्दच झाली. लग्न करूनच्या करून वर पुन्हा या भानगडी ? येऊ दे हा दीडशहाणा आता घरी ! खडसावून विचारतो त्याला की, बिल्डिंगला जिना बांधतात तो काय आशुकमाशुकांना—
**मनकर्णिका :** हे पाहा किशनला इतक्यात काही बोलू नका. पोरानं डोक्यात एकदम राख घातली तर—
**जांबुवंतराव :** म्हणून काय घरात ही धडधडीत इम्मोरॅलिटी खपवून घेऊ ?
**मनकर्णिका :** का ?——त्या वेळी तुमची मी नाही खपवून घेतली ?
**जांबुवंतराव :** अग पण ते तरुणपणी—
**मनकर्णिका :** मग माझा किशन काय म्हातारा झालाय ?
**जांबुवंतराव :** मग काय पाठ थोपटून त्याला ' बक अप ' करू ?
**मनकर्णिका :** पांचटपणा पुरे झाला. त्या दोरास्वामीला सांगा एकीकडं घेऊन— म्हणावं तुझी लेक आणि जावई यांना शहाणा असशील तर मद्रासेकडं पाठवून दे.
**जांबुवंतराव :** तो ऐकणार आहे माझं ? सगळ्या नातेवाइकांना सहकुटुंब सहपरिवार मुंबईला स्थायिक होण्यासाठी निमंत्रण धाडलंय त्यानं. दोन नवी हॉटेलं उघडतो आहे तो या दसऱ्याला.
**मनकर्णिका :** अगबाई सगळ्या नातेवाइकांना ? आणि इतकी माणसं राहणार कुठं ?

**जांबुवंतराव** : आपल्याच या ' श्री सद्गुरु साईबाबा कृपे 'त.

**मनकर्णिका** : साफ चालणार नाही म्हणून सांगा त्याला. वाटल्यास जागा सोड म्हणावं.

**जांबुवंतराव** : म्हणतो— पण—

**मनकर्णिका** : तुम्ही काय खडसावणार त्याला? तिन्ही त्रिकाळ इडली दोशा चारतोय तो तुम्हाला.

**जांबुवंतराव** : म्हणून काही उपकार नाही करत आमच्यावर तो. रेल्वे कँटीनचं कॉंट्रॅक्ट मीच मिळवून दिलंय त्याला.

**मनकर्णिका** : त्याला बजावा, काय वाट्टेल ते झालं तरी ती रुक्मिणी इथं राहता कामा नये.

**जांबुवंतराव** : ते माझ्याकडं लागलं.

**मनकर्णिका** : आणि बरं का–लवकरात लवकर बऱ्यापैकी मुलगी पाहून पहिल्याच मुहूर्तावर किशनचं लग्न उरकून टाकायला हवं. तेवढं झालं की सुटले.

**जांबुवंतराव** : त्यानंतर तुझ्यासाठी काशी-बद्रिकेदारचा पासच काढून आणतो.

**मनकर्णिका** : छाऽन. मला पाठवा काशी-बद्रिकेदाराला आणि तुम्ही मजा मारा इथं.

**जांबुवंतराव** : अगं अगं अगं– चुकतं एखादे वेळी माणसाच्या हातून. म्हणून काय—

**मनकर्णिका** : काही नाही. एक तर माझं काशी-बद्रिकेदार इथ्थं–नाही तर तुम्हाला बरोबर घेऊन. [ तोच दारावरची बेल वाजते. तशी– ] टॅक्सी आणलेली दिसते रामानं. मी जाते–पण सांगितलेलं नीट ध्यानात राहील ना ? [ जांबुवंतराव मान डोलवीतच दार उघडतात तोच प्रथम दोरास्वामी आणि पाठोपाठ तीन लुंगीवाले मद्रासी बांधव आणि सर्वांत शेवटी रामा प्रवेशतो. ]

**जांबुवंतराव** : या या दोरास्वामी–अगदी वेळेवर आलात.

**रामा** : बाई टॅक्सी उभी हाय दाराशी–[ बॅग उचलून पळ काढतो. ]

**दोरास्वामी** : ( रागारागात ) धिस नॉऽऽऽ...गुड्डु मिस्टर जकातदार.... यू मस्ट वाऽऽनं यूर वाईफ....

**मनकर्णिका** : ( जायला निघालेल्या थबकतात आणि उसळून ) काय म्हणून वाऽऽनं ? येऊन डोळ्यानं लुक....कॉक इज ओपन....

**दोरास्वामी :** ते ट्रिक ठाऊक असतो आम्हाला मिसेस जकातदार—बट टाकीत ट्यूब काढून तुम्ही वॉटर कसा काढून घेतो—
**मनकर्णिका :** ( किंचाळत ) बघा बाई....ऐकलंत ?
**जांबुवंतराव :** स्मॉल...स्मॉल आहे बाबत. तुम्ही चला. मी सगळं बघून घेतो.
**मनकर्णिका :** ( संतापाने थरथरत ) पण का म्हणून ? आधी टेक वर्ड्स बॅक.... टेक वर्ड्स बॅक...
**जांबुवंतराव :** टेकतो टेकतो. पण—
**मनकर्णिका :** तुम्ही नाही— दोरास्वामी....
**जांबुवंतराव :** दोरास्वामी— माझं ऐका— वर्डस् टेकून टाका बॅक....
**दोरास्वामी :** बट आइ से बाई ? इव्हन रामा येऊन आमाला सांगती——
**मनकर्णिका :** ( खवळून ) रामा सांगती ? तो रामा तुमच्या डॉटरबद्दल काय सांगती ते—
**जांबुवंतराव :** शट अप. दोरास्वामी — तुमच्या कॅंटीनच्या कंटीन्यूएशनच्या ॲप्लिकेशनवर डी. टी. एस. साहेबांच्या सह्या उद्या होणार आहेत.
**दोरास्वामी :** ( एकदम नूर पालटून ) येस सर...बट
**जांबुवंतराव :** ( जरब देत ) आधी वर्डस् टेक बॅक....
**दोरास्वामी :** ( नरमून ) टेकन बॅक.... [ मागे उभ्या असलेल्या लुंगीवाल्या मद्रासी बांधवांवर स्वभाषेत 'वाये मुडीन्ड् इरूगो !' असे काही गुरकावतो, तसे तेही 'टेकन बॅक...टेकन बॅक...' असे ओरडत शरणागती दर्शवतात. तशी मनकर्णिकाबाई विजयाने फणकारा मिरवीत नाक उडवीत जातात. त्या गेल्यावर जांबुवंतराव दार बंद करून घेतात आणि अंगातला युनिफॉर्मचा कोट काढून फेकत एका खुर्चीवर अंग टाकतात व डोळे मिटून 'ओ गॉड....ओ गॉड...' उद्‌गारीत टाळूवर तळहात आपटतात—तशी— ] बट आई टेल यू मिस्टर जकातदार...वॉटर हॅज बिकम अवर लैफ ॲंड डेथ प्रॉब्लेम—
**जांबुवंतराव :** वॉटर जाऊ द्या समुद्रात.... मॅन— डू यू नो एनिथिंग अबाउट युवर डॉटर ?
**दोरास्वामी :** ( चकित होत ) डॉटऽऽर ? रुक्मिणी ?
**जांबुवंतराव :** हां हां रुक्मिणी—
**दोरास्वामी :** शी गेटिंग मॅरिड. दसरा.... दसरा.... मुहूर्त ऑन दसरा.

**जांबुवंतराव :** तो मुहूर्त विसरा. दोरास्वामी, तुमच्या रुक्मिणीचं लग्न झालंय.

**दोरास्वामी :** व्हाऽऽऽट ?

**जांबुवंतराव :** गॉट मॅरिड. आहात कुठं ? व्हेअर यू आर ?

**दोरास्वामी :** ( किंचाळत ) धिस इज टू मच मिस्टर जकातदार.

**जांबुवंतराव :** ( ओरडत ) टू मच नाही. दोरास्वामी, धिस इज टू लिटिल.

**दोरास्वामी :** ( थक्क होत ) रुक्मिणी ? .... मॅरेज करतो ? मला न सांगता ? इम्पॉसिबल !

**जांबुवंतराव :** दोरास्वामी, रुक्मिणी मॅरेज करतो. करतो म्हणजे केलं. फॅक्ट आहे ही, मॅन, फॅक्ट.

**दोरास्वामी :** बट आइ से, हू द ब्लडी हेल— ?

**जांबुवंतराव :** विचारा, विचारा तुमच्या या लुंगीवाल्या मद्रदेशीय बांधवांनाच— हू द ब्लडी हेल इज ते विचारा.

**दोरास्वामी :** व्हाऽऽऽट ? [ असे म्हणत लुंगीवाल्या मद्रासी बांधवांकडे डोळे वटारून पाहत स्वभाषेत काही जरबेचे प्रश्न विचारतात. तशी ते बांधव धाबरे-घुबरे होत, पिस्तुल रोखल्याप्रमाणे दोन्ही हात वर करीत— " नॉट आई नॉट आई " असे किंचाळतात. तशी— ] आई मस्ट फाइंड आउट दॅट ब्लडी बास्टर्ड.

**जांबुवंतराव :** तो बास्टर्ड तुमच्या वरीच आहे. जा, आणि शोधा त्याला. [ दोरास्वामी तावातावाने चालते होतात. पाठोपाट त्यांचे लुंगीवाले मद्रासी बांधव देखील जातात. जांबुवंतराव मोठी थोरली जांभई देतात. पायांतले बूट आणि मोजे काढतात आणि ' हुऽऽश ' करीत आत जाण्यासाठी वळतात तोच दारावरील बेल खणखणते. तशी माघारी वळत— ] पुन्हा, पुन्हा सांगितलं कॉक ओपन आहे, पाण्याला प्रेशर नाही तरी— [ असे म्हणत दार उघडतात तोच दबकत, भीत आत प्रवेशतो किशन. अंगात काळा बॉयलर सूट आणि डोक्याला बांधलेला मेणचटलेला रुमाल. ]

**जांबुवंतराव :** किशाऽऽ तू.... तू होय ? मला वाटलं,—

**किशन :** ( बसक्या आवाजात ) डॅडी, ममी कुटंय ?

**जांबुवंतराव :** आत पानं वाढते आहे.

**किशन :** ( मटकन बसत ) वारलोऽऽऽ ( जांबुवंतराव खदखद हसू लागतात.

तशी ) डॅडी यू आर जोकिंग....
**जांबुवंतराव :** किशा, तू गाढव आहेस. अरे मूर्खा, तुझ्या ममीचं गणेशोत्सवात आज नाटक नाही का ?
**किशन :** येस, येस—
**जांबुवंतराव :** मग ? नाटकाच्या वेळी ती इथं घरात कशी असेल ?
**किशन :** आय ॲम सॉरी डॅडी - हे माझ्या लक्षातच आलं नाही.
**जांबुवंतराव :** आधी आत चल. जेवू या दोघं आपण. मग शांतपणे बातचीत करू या.
**किशन :** ( उघडया दाराकडे साभिप्राय पाहत ) डॅडी, तुम्ही आत चला अन जेवून घ्या. मला की नाही आज भूकच नाही. म.... म.... मी थोडासा आराम करायचा म्हणतो.
**जांबुवंतराव :** का ? रजेचा अर्ज टाकून दिवसभर उंडारलास, तेवढ्यानं थकवा आला ?
**किशन :** ( किंचाळत ) हे.... हे तुम्ही ममीला सांगितलंत् ?
**जांबुवंतराव :** नाही. तेवढी अक्कल दिलीय देवानं मला. पण किशा, तुला पण एक सल्ला देऊन ठेवतो— लग्न झालेल्या बाईशी माणसानं भानगड करू नये. हा बाईचा नाद भारी वाईट !
**किशन :** ( किंचाळून ) डॅडी ! व्हॉट द हेल डू यू मीन ?
**जांबुवंतराव :** माझा मीनिंग तुला पक्का ठाऊक आहे.
**किशन :** साफ साफ खोटं आहे, डॅडी—
**जांबुवंतराव :** खोटं आहे ? साफ खोटं आहे ? मग त्या दोरास्वामीच्या कारटी-बरोबर जिन्यात उभं राहून तासन् तास तू काय अध्यात्माचा खल करीत असतोस ?
**किशन :** ( संतापून ) कोणी सांगितलं तुम्हाला हे ?
**जांबुवंतराव :** तुझ्या ममीनं.
**किशन :** ममीजवळ कोणी केली ही चुगली ?
**जांबुवंतराव :** रामा. दुसरा कोण ? तुझ्यामाझ्या चहाड्या सांगण्यासाठीच ना ममी त्याला पगार देते ?
**किशन :** हरामखोर, बदमाश. विश्वासघातकी—
**जांबुवंतराव :** इनफ इनफ ! आधी आपण जेवण करू आणि मग स्वस्थपणानं

वोल्ड् या विषयावर.

**किशन :** डॅडी–त्या दोरास्वामीच्या मुलीचं म्हणजे रुक्मिणीचं भांडण झालंय तिच्या नवऱ्याशी....

**जांबुवंतराव :** काल परवा लग्न झालं आणि आज भांडण ?

**किशन :** तेच सांगत होतो मी....म....म....मी तिला हेल्प करीत होतो. म्हणजे ॲडव्हाइस... ॲडव्हाइस.... नवरा फ्रेंड आहे माझा तो तो–रामस्वामी–रामस्वामी मुदलियार ?

**जांबुवंतराव :** आधी जेवण करू या........पोटात भुकेने कावळे कोकलायला लागलेत.

**किशन :** (दाराकडे पाहत) डॅडी, मला भूकच नाही. दुपारी खूप खाल्लंय. तुम्ही आत चला आणि जेवून घ्या. तोवर मी–डॅडी–फार सीरियस प्रकरण आहे हे–तुम्ही आत चला आणि जेवा.

**जांबुवंतराव :** भलतंच ? मी एकटाच जेवलो असं तुझ्या ममीला कळलं तर—

**किशन :** म....मी मी सांगेन ममीला–(त्यांना आत ओढीत नेत) पण तुम्ही ? भूक लागलीय ना तुम्हाला डॅडी ?

**जांबुवंतराव :** ते खरं....पण अरे अरे....अरे पण... [असे ओरडत असतानाच जांबुवंतरावांना किशन ओढून आत घेऊन जातो. क्षणार्धातच रुक्मिणी दारात येऊन उभी राहते. क्षणभराने— ]

**किशन :** [गडबडीने प्रवेशत] नाउ नो वरी....ये, आत ये ना–कम इन....

**रुक्मिणी :** (भीत भीत दबकत आत येत) यूवर डॅडी...

**किशन :** हॅऽऽ ! ईटिंग....ईटिंग म्हणजे डॅडींना ग्रेट ग्रेट जॉय !

**रुक्मिणी :** रिअली ?

**किशन :** तर काय ? फोर फाइव्ह मेनचं फूड डॅडी बसल्या ताटात फिनिश करतात.

**रुक्मिणी :** रिअली ?

**किशन :** आस्क दोरास्वामी. कॅंटीनमधे गेले की सिक्स इडली आणि एट डोशाशिवाय उठत नाहीत. आता डिनर संपवतील आणि कुंभकर्णासारखे स्लीपतील.

**रुक्मिणी :** अय्यय्यो–कुंभकर्णन् ? रामायणम् ? रामा–ग्रेट हीरो...मॅरिड सीता लाइक अस....

**किशन :** तो रामा नाही–तो कृष्णा...यू टोल्ड दोरास्वामी ?

**रुक्मिणी :** नो नो....आइ अफ्रेड...यू ?

**किशन :** आय नॉट अफ्रेडिंग कुणाच्या फादरला. वुई आर मॅरिड नाऊ....

**रुक्मिणी :** वुई मस्ट टेल....अँड देन गो टू हनीमून....

**किशन :** स्लोली...स्लोली.... एकदम नाही.... यू वेट. आय गो इन... चेंज धिस कपडा— अँड ब्रिंग माय बॅग....

**रुक्मिणी :** बट कम अर्ली—

**किशन :** डेफीनिटली. थर्टीवन अप कॅच करायची आहे ना आपल्याला ?

**रुक्मिणी :** बट बिफोर दॅट...वुई मस्ट टेल....ॲटलीस्ट फादर...

**किशन :** बघू. [ लगबगीने आत जातो. रुक्मिणी दालनातील सगळ्या वस्तू न्याहाळत दाक्षिणात्य पद्धतीने गाणे गुणगुणत इतस्ततः हिंडते. 'ओरे ओर उरले ओरे ओर राजा.' तेवढ्यात उघड्या दारातून लगबगीने प्रवेशतो—जॉनी डिक्रूस्टा. ]

**जॉनी :** किशन—( तिला पाहताच थबकतो. )

**रुक्मिणी :** अय्यय्योऽऽ ! गॉन इन.

**जॉनी :** कॉल हिम आऊट. थर्टीवन अप ब्रेकडाऊन झालीय. इंजिन घेऊन तावडतोब निघायचंय. इमर्जेन्सी कॉल.

**रुक्मिणी :** अय्यय्योऽऽ ! हू यू ?

**जॉनी :** जॉनी डिक्रूस्टा. फायरमन. कॉल हिम आउट.

**रुक्मिणी :** इम्पॉसिबल. ही नॉट कमिंग.

**जॉनी :** नॉट कमिंग म्हणजे—? हा इमर्जेन्सी कॉल आहे मॅडम...

**रुक्मिणी :** बट वुई गोइंग टू हनीमून...

**जॉनी :** ( डोळे विस्फारीत किंचाळत ) व्हॉट ?

**रुक्मिणी :** येस टू हनीमून....टेक अनदर ड्रायव्हर...

**जॉनी :** ( किंचाळत ) यू गोइंग हनीमून ? त...त . तुम्ही दोरास्वामीची डॉटर रुक्मिणी....ॲम आय करेक्ट...?

**रुक्मिणी :** येस...येस....यू करेक्ट....बट आइ ॲम किशन्स मिस्ट्रेस...

**जॉनी :** ( किंचाळत ) यू व्हाऽऽट ? मिस्ट्रेऽऽस ? गुड हेवन्स ! दोरास्वामीची डॉटर किशनची मिस्ट्रेस ?

**रुक्मिणी :** ( लाजून मुरका मारीत ) अय्यय्यो, फ्रॉम टुडे ओन्ली.

**जॉनी :** ( भयाण मुद्रा करीत ) किशन इज गोइंग फास्ट....



55478

**रुक्मिणी :** इव्हरीथींग हॅपंड फास्ट...लिटल् टाईम ..

**जॉनी :** ( धक्का बसून ) धिस इज सीरियस ! ऑफुल ! हॉरिबल ! यू सेड–यू आर हिज मिस्ट्रेस ?

**रुक्मिणी :** ( लाजून ) फ्रॉम टुडे ओन्ली.

**जॉनी :** ( ओरडत ) धिस मस्ट स्टॉप.

**रुक्मिणी :** ( आवेशाने ) यू कान्ट स्टॉप अवर लव्हिंग !

**जॉनी :** ( थक्क होत ) तोबा ! तोबा !

**रुक्मिणी :** ( रागाने ) डोन्ट टॉक हिंदी, आइ हेट इट !

**जॉनी :** आय मस्ट इन्फॉर्म दोरास्वामी– [ आवेशाने चालता होतो, तोच कपडे बदलून हातात सूटकेस घेऊन किशन गडबडीने प्रवेशतो आणि– ]

**किशन :** कोण आला होता ? हू केम ?

**रुक्मिणी :** युवर फ्रेंड– जॉनी डिक्रूस्टा.

**किशन :** ( हतबुद्ध होत ) आला आणि इतक्यात गेला ? ( रुक्मिणी ' कोण जाणे ' असा आविर्भाव करीत खांदे उडवते. )

**किशन :** ( हसत ) एक वल्ली आहे हा जॉनी...बडा राजा आदमी आहे.

**रुक्मिणी :** व्हाऽऽट ?

**किशन :** ग्रेट किंग आहे हा जॉनी !

**रुक्मिणी :** ( डोळे विस्फारीत ) अय्यय्यो– ग्रेट किंग ? अँड ड्रइंग फायरमन ? व्हॉट स्टेट ?

**किशन :** किंग म्हणजे—तसा किंग नव्हे ग... किंग... किंग.... ग्रेट... ग्रेट लव्हली, वंडरफुल, लार्फिंग, जोकिंग– एकदम फ्रेंडली ! काय म्हणत होता तुला ? व्हॉट सेड ही ?

**रुक्मिणी :** आइ से– आइ ॲम यूर मिस्ट्रेस. गॉट ॲंग्री. सेड– ऑफुल ! हॉरिबल धिस मस्ट स्टॉप !

**किशन :** अच्छाऽऽ ? देन ? चांगलं ठणकावायचंस की नाही त्याला ? व्हॉट यू से ?

**रुक्मिणी :** आइ से—यू कान्ट स्टॉप अवर लव्हिंग....

**किशन :** ( खुलून ) टाळी दे. क्या बात है !

**रुक्मिणी :** ( उसळून ) डोन्ट टॉक हिंदी—आय हेट इट !

**किशन :** छोड दो—( हसत ) तुम्हा मद्रासी स्त्रियांना देखील हिंदीपेक्षा इंग्रजी

प्यार आहे हे लक्षात राहिलं नाही माझ्या. ( — आणि एकदम डोक्यात ट्यूब लाइट लागत ) तू...तू....काय सांगितलंस त्याला ? व्हॉट यू सेड ? हू आर यू माईन ?

**रुक्मणी :** ( लाजून मुरका मारीत ) अय्यय्योऽऽ यूर मिस्ट्रेस....

**किशन :** ( किंचाळत ) मिस्ट्रेस ?

**रुक्मिणी :** फ्राम टुडे ओन्ली.

**किशन :** ( थक्क होत ओरडून ) असं सांगितलंस तू त्याला ? नॉन्सेन्स.... मिस्ट्रेसचा अर्थ कळतो तुला ? नो मीनिंग ऑफ मिस्ट्रेस ?

**रुक्मिणी :** वाइ नॉट ?.... वाइफ वाइफ...

**किशन :** मग गाढवे वाइफ म्हणायचं नाहीस ? मिस्ट्रेस का म्हणालीस ?

**रुक्मिणी :** अय्यय्योऽऽऽ वाइफ इज नॉट मिस्ट्रेस ?

**किशन :** ( कपाळावर हात मारून घेत ) कर्म माझं ! अगं मिस्ट्रेस नाही मिसेस ! मिस्ट्रेस....म्हणजे....म्हणजे काय सांगू तुला ? बॅड वूमन....बॅड बॅड.... ( नाकावर बोट आपटीत ) बॅऽऽड.

**रुक्मिणी :** ( किंचाळत ) ईऽऽऽ... ( घाबरून ) जॉनी गॉन टेलिंग माइ फादर....

**किशन :** ( किंचाळत ) व्हॉऽऽट ? दोरास्वामीला जाऊन जॉनी हे हे सांगणार आहे ?

**रुक्मिणी :** ( रडवेली होत ) आइ मिस्टेक्ड. व्हाट वुइल फादर डू ?

**किशन :** ( हतबुद्ध होत ) दुपारी हॉटेलात काय खाल्लंस तू ?

**रुक्मिणी :** खिमा फ्राय...

**किशन :** तुझा फादर येऊन तेच करील आता माझं.

**रुक्मिणी :** यूर फादर वुइल अँग्री ?

**किशन :** फादरची गोष्ट सोड. ममीच्या कानावर जर असलं काही गेलं तर कुटून काढील ती मला.

**रुक्मिणी :** ( रडू लागते ) अय्यय्योऽऽऽ

**किशन :** अगं अगं, हे काय ? स्टॉप वीपिंग...स्टॉप वीपिंग....व्हाय क्राय ? आय ॲम ना ?

[ रुक्मिणी स्वभाषेत ' कर्ममे ! इद एन्न आईडत ! ' असे खेददर्शक

उद्गार काढीत तडातडा तोंडात मारून घेऊ लागते तशी तिचा हात धरून तिला आवरीत किशन– ]

**किशन :** व्हाट इज धिस ? व्हॉट इज धिस ?

**रुक्मिणी :** ( किंचाळत ) बॅड वूमन...अय्यय्योऽऽऽ ( गळा काढून रडू लागते तशी– )

**किशन** ) ( जरबेने ) स्लोली म्हणतो नाऽऽऽ–रडू नकोस माझे आईऽऽऽ

[ तोच आतून 'अऽऽव...बाऽऽ' असा ढेकर देत जांबुवंतराव 'किशन'–अशी हाक मारीत नाइट ड्रेसमध्ये प्रवेशतात आणि दारातच थबकून– ]

**जांबुवंतराव :** काय भानगड आहे ही ?

**किशन :** ( गडबडून ) जेवण झालं इतक्यात डॅडी तुमचं ?

**जांबुवंतराव :** आज कॅंटीनमधे अमळ जास्त झालं होतं खाणं...तरी सगळं संपवलं. पण हीऽऽ

**किशन :** ही दोरास्वामीची मुलगी. रुक्मिणी.

[ रुक्मिणी उठून नमस्कार करते तशी– ]

**जांबुवंतराव :** रात्र झाली तरी तुझा ॲडव्हाइस संपला नाही अजून ?

**किशन :** झालं, संपलंच ! तर रुक्मिणी आता प्रॉपरली बिहेव करायचं हं, नो क्वारलिंग. ( बॅग उचलत ) डॅडी, हिला मी पोचवून येतो हं....

**जांबुवंतराव :** ( जांभई देत ) खालच्या मजल्यावर पोचवायला तू कशाला जायला हवंस ? तिला जिना उतरता येत नाही ?

**किशन :** असं काय करताहात डॅडी–रामस्वामी कुलाब्याला राहतो—

**जांबुवंतराव :** म्हणजे हिला घेऊन तू कुलाब्याला जाणार आहेस ?

**किशन :** मग काय हिला एकटीलाच टॅक्सीत बसवून देऊ ?

**जांबुवंतराव :** रामस्वामीकडं हिला पोचवायचं–तर त्याला तूच कशाला हवास ? दोरास्वामीला सांग...

**किशन :** डॅडी डॅडी–कसं सांगायचं तुम्हाला ? अहो दोरास्वामीचं आणि त्यांचं भांडण झालंय. एकमेकांचं तोंड बघायला तयार नाहीत ही दोघं. ( बॅग उचलून ) चल...चल लवकर रुक्मिणी...

**जांबुवंतराव :** किशा–आणि बॅग घेऊन तू कुठं निघालास ?

**किशन :** डॅडी थर्टीवन अपवर मला डयूटी कॉल आला आहे.

**रुक्मिणी :** (आठवून) अय्यय्यो– जॉनी डिक्रूस्टा सेड.... थर्टीवन अप इंजिन ब्रेकडाउन. इमर्जन्सी कॉल टू यू....

**किशन :** आंऽऽ? यू नेव्हर टोल्ड मी दॅट....

**रुक्मिणी :** फरगॉटन....

**किशन :** बिग फूल.... हे तू मला आत्ता सांगते आहेस? टेलिंग मी जस्ट नाऊ?

**जांबुवंतराव :** काही बिघडत नाही किशा. तू डयुटीवर जा. रुक्मिणीला मी जाऊन कुलाब्याला पोचवून येईन.

**किशन :** छे छे भलतंच काय डॅडी– अहो त्या रामस्वामीचा पत्ता शोधावा लागेल–

**जांबुवंतराव :** काळजी करू नकोस– मी शोधून काढीन.... तू जा आधी. डयुटी फर्स्ट....

**किशन :** (गडबडून) पण डॅडी कशाला.... कशाला उगीच....?

**जांबुवंतराव :** कशाला म्हणजे काय? तू हो पुढं. हिला थांबू दे इथं. हा मी आलोच कपडे करून.

[लगबगीने आत जातात. किशन डोके धरून मटकन बसतो तशी– ]

**रुक्मिणी :** अय्यय्योऽऽ नाऊ व्हाऽऽट?

**किशन :** नाऊ बोंबला.

**रुक्मिणी :** व्हाऽऽट? डोन्ट स्पीक हिंदी. आइ हेट इट !

**किशन :** (उसळून) धिस इज अस्सल मराठी.

**रुक्मिणी :** (रडवेली होत) अय्यय्योऽऽ हू धिस रामस्वामी मुदलियार?

**किशन :** माझं भूत.... माय घोस्ट.... झक मारली आणि तुझ्या प्रेमात पडलो....

**रुक्मिणी :** बट वाइ नॉट टेलिंग ट्रूथ?

**किशन :** (उठत) नॉट नाऊ.... (तिचा हात धरून ओढून नेत) कम ऑन....

**रुक्मिणी :** नो नो– माइ फादर वुइल कॉल मी बॅड वूमन.... लेट अस टेल.

**किशन :** जहान्नममध्ये गेला तुझा बाप....यू आर माय वाइफ नाऊ.... कम ऑन आय से....

[तिच्या हाताला धरून ओढत घेऊन जातो. क्षणभर शांतता. मग बाहेर जिन्यातून वर येणाऱ्या माणसांचा गलबला ऐकू येतो. क्षणार्धातच उघडया

दारातून प्रवेशतात सौ. मनकर्णिकाबाई. मनकर्णिकाबाई येतात त्या मुळी जिन्यात उभ्या असलेल्या माणसांना निरोप देत. दारात— उंबऱ्यावर उभ्या राहून त्या बाहेरच्या मंडळींना म्हणतात— "…. तर काय बाई…. माझी देखील केवढी निराशा झाली. पण या मेल्या फुकट्या प्रेक्षकांनी आरडाओरडा करून नाटकच बंद पाडायचं ठरवलं त्याला कोण काय करणार ?…. तरी मी सेक्रेटरींना सांगत होते— नाटक फुकट ठेवू नका म्हणून. फुकट म्हटलं की मराठी माणसं मेली हावरटासारखी तुटून पडायचीच…. तरी बरं मी म्हणते— सौम्य छडीमारावर भागवलं पोलिसांनी…. गोळीबार केला असता तर ? बरंय अच्छाऽऽआवजो…. बाऽय…. " जिन्यातली मंडळी निघून जातात आणि बॅग घेऊन आत येत मनकर्णिकाबाई 'हुशऽऽ!' करीत एका खुर्चीवर बसतात आणि घाम पुसू लागतात. क्षणार्धातच बाहेर जायचा पोषाख करून जांबुवंतराव प्रवेशतात आणि खुर्चीवर बसलेल्या पाठमोऱ्या बाईंनाच रुक्मिणी समजून त्यांच्याकडे न बघताच बॅग उचलून तरातरा दाराकडे जात म्हणतात— ]

**जांबुवंतराव** : हूं. चल रुक्मिणी— ही यायच्या आत तुला पोचवून मला परतायला हवं.

**मनकर्णिका** : (थक्क होत) अहो राजेश्री— कुटं कुठं निघालात ?

**जांबुवंतराव** : (दाराशी थबकतात. वळून बघतात. तशी बॅग गळून पडते आणि— ) आं ? तूऽऽ ? आत्ताऽऽ ? या वेळीऽऽऽ ?

**मनकर्णिका** : काऽऽ ? तुमच्या मजा मारण्यात काही व्यत्यय आला वाटतं ?

**जांबुवंतराव** : (गडबडून) छे छे— म्हणजे तुझा गैरसमज—

**मनकर्णिका** : कोणाला पोचवायला निघाला होतात ?

**जांबुवंतराव** : (गडबडून) ती आपली ह्यांची— हीऽऽग….

**मनकर्णिका** : रुक्मिणी. ती तुम्हाला कुठं भेटली ?

**जांबुवंतराव** : कुठं म्हणजे…. म्हणजे…. इथंच….

**मनकर्णिका** : जिन्यात ?

**जांबुवंतराव** : छे छे— घरातच.

**मनकर्णिका** : घरात ? हद्द झाली. किती दिवस चालल्या आहेत अशा चोरून गाठीभेटी ?

**जांबुवंतराव :** अगं अगं—भलतंच काय बोलतेस ? मी आज तिला पहिल्यांदा पाहिली. म्हणजे काय झालं तिच्या नवऱ्याशी तिचं झालं भांडण—

**मनकर्णिका :** म्हणून त्या दोघांचा आपल्याला कळवळा आला. भांडण मिटवण्यासाठी माझ्या अपरोक्ष तिला घरी बोलावून तिची समजूत घातलीत—

**जांबुवंतराव :** तसं नव्हे गंऽऽ

**मनकर्णिका :** मग कसं ? आणि मी परत यायच्या आत तिला पोचवून यायची घाई कशासाठी ?

**जांबुवंतराव :** अगं म्हणजेऽऽ—कसं सांगू तुला आताऽऽ ?

**मनकर्णिका :** खोटारडे मेले. कुठं पोचवायची होती तिला ?

**जांबुवंतराव :** क....क....कुलाब्याला.

**मनकर्णिका :** म्हणजे तिला घेऊन तुम्ही या वेळी कुलाब्याला निघाला होतात ? काही शरम वाटते का ?

**जांबुवंतराव :** तसं नाही...द...द... दोरास्वामीकडं.

**मनकर्णिका :** बोलताहात काय ? दोरास्वामीकडं ? दोरास्वामी कुलाब्याला राहतो ?

**जांबुवंतराव :** नाही नाही—रामस्वामी.... रामस्वामी....तो रामस्वामी मुदलियार नाही का ?

**मनकर्णिका :** कोण रामस्वामी ? कोण मुदलियार ?

**जांबुवंतराव :** ते...ते...किशनला ठाऊक आहे....म्हणजे...

**मनकर्णिका :** किशन ? किशनचा काय संबंध आहे ?

**जांबुवंतराव :** तोच तर घेऊन आला होता तिला इथं. त्याला ड्यूटीवर जायचं होतं म्हणून मी म्हटलं की—

**मनकर्णिका :** तू ड्यूटीवर जा—मी बघतो हिच्याकडं....असंच ना ?

**जांबुवंतराव :** अगं काहीतरीच काय बडबडतेस ? दोरास्वामीची मुलगी—मला मुलीसारखी—

**मनकर्णिका :** त्या मागच्या टवळीबद्दल असंच म्हणत होतात. आता फसायची नाही मी.

**जांबुवंतराव :** अग पण—

**मनकर्णिका :** कुठं आहे ती सटवी ? बोला आधी सांगा—कुठं आहे ती जगदंबा ?

**जांबुवंतराव** : ( भेदरून ) आत्ता इथं होती ती.

**मनकर्णिका** : इथं होती ? आत्ता ? मग काय एकदम जादूनं अदृश्य झाली ?

**जांबुवंतराव** : किशन तिला घेऊन गेला की काय—

**मनकर्णिका** : उगीच थापा मारू नका. तुमचीच भानगड आहे ही. आता माझी पक्की खात्री झालीय.

**जांबुवंतराव** : अगं नाहीऽऽऽ किशन तिला घेऊन इथं आला आणि—

**मनकर्णिका** : उगाच स्वत:चं पाप मुलाच्या गळी मारू नका. माझा मुलगा कध्धी परस्त्रीकडं नजर उचलून पाहायचा नाही. तिची भाषा तरी त्याला येती आहे ? तिला मराठी कळतंय ?

**जांबुवंतराव** : तसं म्हणत नाही मी—पण—

**मनकर्णिका** : पण नाही अन वीण नाही—कुठं लपवली आहे तिला ?

**जांबुवंतराव** : छे छे अगं—

**मनकर्णिका** : तसे नाही कबूल व्हायचे तुम्ही. मीच तिला शोधून आणते. जाते कुठं—[ असे म्हणत तावातावाने मनकर्णिकाबाई पदर आडवा खोचत आत जातात. प्रलय झाल्यासारखी मुद्रा करीत जांबुवंतराव मटकन एका खुर्चीत कोसळतात. तोच तावातावाने संतापलेले दोरास्वामी आणि मद्राचे त्यांचे तीन-चार लुंगीवाले मद्रासी बांधव स्वभाषेत 'तीरट् रास्कले, वेट्टी तान् पोडणम् !' असे काही क्रोधयुक्त स्वरात बडबडत प्रवेशतात. दोरास्वामींच्या हातात सुरा आहे आणि डोळे खदिरांगारासारखे लाल, मुद्रा पिसाळलेली....त्यांना त्या अवतारात पाहताच जांबुवंतराव भयभीत होऊन, दोन्ही हात वर करीत लटलट कापत उभे राहतात—]

**दोरास्वामी** : ( सुरा दाखवीत ) व्हेअर....व्हेअर इज शीऽऽऽ ?

**जांबुवंतराव** : ( लटलट कापत ) म...म...मला माहीत नाही दोरास्वामी... श...श...शांत व्हा...

**दोरास्वामी** : व्हेअर इज दॅट बास्टर्ड...? किशन—दॅट रास्कल कुठं असती ?

**जांबुवंतराव** : म....म....म....मघाशी इथं असती....पण आता इथं नसती....

**दोरास्वामी** : ( किंचाळत ) आइ ॲम गोइंग टू किल हिम...

**जांबुवंतराव** : ( भेदरून ) प्लीज डोन्ट...मला वाटतंय किशन तिला पोचवायला गेलाय...

**दोरास्वामी** : डोन्ट ब्लफ मॅन–त्यानं रुक्मिणीचा लाईफ रुईन केला.

**जांबुवंतराव** : न...नाही...नाही...हो–उलट तिचं कल्याण करण्यासाठीच त्याची धडपड चालली होती.

**दोरास्वामी** : व्हाऽट रॉट यू टॉक ? रुक्मिणीला मिस्ट्रेस म्हणून ठेवतो हा काय कल्याण करतो ?

**मनकर्णिका** : [तरातरा आतून परत येत] कोणी रुक्मिणीला मिस्ट्रेस म्हणून ठेवली ? (यजमानांना) तुम्ही ?

**जांबुवंतराव** : अहो नाहीऽऽ दोरास्वामींच्या हातातला सुरा तरी बघून बोला. आपल्या किशनला ठार मारायला आले आहेत ते. ते म्हणतात, किशननं रुक्मिणीला ठेवलीय.

**मनकर्णिका** : खूप पाहिले आहेत असले मारणारे. लाज वाटायला पाहिजे दोरास्वामी, माझ्या मुलावर असले घाणेरडे आरोप करताना.

**दोरास्वामी** : आरोप नाही–फॅक्ट आहे हा फॅक्ट मिसेस जकातदार.

**मनकर्णिका** : काय फॅक्ट आहे ? किशननं रुक्मिणीला ठेवली ही फॅक्ट ? काय पुरावा आहे तुमच्यापाशी ?

**दोरास्वामी** : आस्क–इव्हन जॉनी डिक्रूस्टा म्हणाली–

**मनकर्णिका** : कोण ही जॉनी डिक्रूस्टा ? आणा सटवीला माझ्यापुढं. तिच्या झिंज्या उपटते आणि–

**जांबुवंतराव** : अगं अगं–जॉनी म्हणजे ती नव्हे–तो तोऽऽऽ, जॉनी फायरमन–

**मनकर्णिका** : मग नीट शुद्ध मराठी बोलायला काय होतं यांना–?

**दोरास्वामी** : स्पीक इन इंग्लिश–वुइ आर मद्रासीज–वाइ शुड वुई स्पीक मराठी ?

**मनकर्णिका** : आमच्या मुंबईत राहून ही मग्रूरी ?

**दोरास्वामी** : मिसेस जकातदार आइ वार्न यू–मुंबई तुमचा नाही. बॉम्बे कॉस्मॉपॉलिटन आहे.

**जांबुवंतराव** : (उसळून) दोरास्वामी–मी तुम्हाला बजावून ठेवतो, पुन्हा मुंबई-बद्दलचा वाद उकरून काढू नका. एकशेपाच हुतात्म्यांचं रक्त सांडून मुंबई आम्ही मिळवलीय...आमच्या मेहेरबानगीनं तुम्ही इथं राहता आहात. याद राखा–

**दोरास्वामी** : नो मेहेरबानगी मिस्टर जकातदार–इंडियात कोणीही कुठंही

बिझिनेस करू शकती. इव्हन कॉन्स्टियूशन सेज—

**मनकर्णिका :** कॉन्स्टिपेशनच्या गप्पा आम्हाला नका शिकवू. कॉन्स्टिपेशन हिंदीला राष्ट्रभाषा मानते. तुम्ही मानता ? कॉन्स्टिपेशनमध्ये—

**जांबुवंतराव :** अगं अगं—कॉन्स्टिपेशन नाही—कॉन्स्टिटयूशन—

**मनकर्णिका :** (उसळून) तुम्ही उगाच माझ्या इंग्रजीच्या चुका काढू नका. इंग्रजी जोडभाषा म्हणून ठेवायला माझा सक्त विरोध आहे. आयदर स्पीक मराठी ऑर स्पीक हिंदुस्थानी.

**दोरास्वामी :** आय वोण्ट स्पीक हिंदुस्थानी—

**मनकर्णिका :** अस्सं का—मग मैं आपके साथ हिंदीमेंही बातचीत करेंगा, करेंगा, करेंगा !

**जांबुवंतराव :** कशाला...कशाला उगीच हिंदी भाषेचे हाल करतेस ? मराठीच बोल ना...

**मनकर्णिका :** तुम्ही मधे नाक खुपसू नका. नाहीतर तुमच्याशी भी मैं जन्मभर हिंदीमें बोलूंगा...

**जांबुवंतराव :** (किंचाळत) नको...नको...शब्द परत घेतो मी माझे. बोल. हिंदीतच बोल दोरास्वामीशी.

**मनकर्णिका :** तो बताइये दोरास्वामीजी, जॉनी डिकूस्टाने आपको क्या कहा ?

**दोरास्वामी :** हिंदी हमको नही समझता. मराठीमें बोलो या आंग्रेजीमें...

**मनकर्णिका :** (पाय आपटून) नही. हिंदीमें—

**दोरास्वामी :** (टेबलावर मूठ आपटीत) नाही— मराठीमें या आंग्रेजीमें—

**जांबुवंतराव :** मी एक तडजोड सुचवू का— मनकर्णिके, तू हिंदीमें बोल और दोरास्वामीजी यू स्पीक इन मराठी....ॲग्रीड ?

**मनकर्णिका :** ॲग्रीड...बट नो इंग्लिश....

**दोरास्वामी :** हां हां— ॲग्रीड...आंग्रेजी हमारा मदरटंग तो नही ? मराठी तर मराठी.

**मनकर्णिका :** तो बताइये दोरास्वामी, जॉनी डिकूस्टाने आपको क्या कहा ?

**दोरास्वामी :** उन्होन्हे कहा—आय मीन—जॉनी टोल्ड—

**जांबुवंतराव :** नो इंग्लिश....नो हिंदी....मराठी मराठी....

**दोरास्वामी :** जॉनी डिकूस्टा म्हणाली—

**मनकर्णिका :** म्हणाली नाही म्हणाला—

**दोरास्वामी :** तुम्ही तुम्ही तुमचा हिंदी संभाळा—मी माझा मराठी बघेन.

**मनकर्णिका :** पण काही लिंगवचनाचं तारतम्य तरी पाळाल की नाही ?

**जांबुवंतराव :** अग अग—कशाला त्या लिंगवचनाच्या जंगलात शिकार करते आहेस तू यांची ?

**मनकर्णिका :** ( उसळून ) तुम्ही मधे बोलू नका. तुमचा कोणी नपुंसकलिंगी शब्दांत उल्लेख केला तर खपेल तुम्हाला तो—?

**जांबुवंतराव :** ( तोंडात मारून घेत ) चुकलो ! चुकलो ! पण मनकर्णिके— या भाषेच्या भानगडीत मुद्दयाची गोष्ट तशीच राहते आहे. जॉनी डिकूस्टा काय म्हणाली वा म्हणाला ते अजून कळलंच नाही आपल्याला.

**मनकर्णिका :** खरंच—काय म्हणाला हो तो दोरास्वामी ?

**दोरास्वामी :** हिंदी में—हिंदी में बोलो—मराठी हमारी भाषा है.

**जांबुवंतराव :** सोडून द्या—दोरास्वामी—तुमच्या मराठीत तुम्ही सांगा— जॉनी काय म्हणाला ?

**दोरास्वामी :** जॉनी डिकूस्टा म्हणाली—मी इथं आली [ लिंगभेदाचा खून ऐकून क्षणाक्षणाला मनकर्णिकाबाई एरंडेलचे घुटके घ्यावेत तशा मुद्रा करतात. त्यांच्या मुद्रा पाहून जांबुवंतराव कासावीस होतात आणि हातवारे करून " जाऊ द्या.... जाऊ...." असे सुचवतात. ] मी इथं आली तो समोर खुर्चीवर रुक्मिणी बसलेला....रुक्मिणीला जॉनी विचारती ते किशन कुठं गेलं ?

**मनकर्णिका :** ( उसळून ) ते किशन कुठं गेलं ? समजता काय तुम्ही माझ्या मुलाला ? पुरषासारखा पुरुष आणि—तुम्ही त्याला—ते किशन म्हणता ? हे हे मी मुळीच सहन करणार नाही.

**दोरास्वामी :** हिंदी में....हिंदी में....हिंदीमें बोलो....मराठी हमारी है....

**जांबुवंतराव :** अगं अगं जाऊ दे—त्यांचा तसा काही म्हणण्याचा मतलब नव्हता. मनकर्णिके, दोष त्यांचा नाही— दोष त्यांचा नाही.

**मनकर्णिका :** त्यांचा नाही तर मग कोणाचा ? नाही— फिर किसी का ?

**जांबुवंतराव :** ये मराठी भाषा और ये भाषेमें लिंगवचन का भेद जिन्होने घडवला हैना उसीका दोष है. क्यूँ दोरास्वामीजी ?

**दोरास्वामी :** बिलकुल ठीक...साला ये ' तो—ती—और ते ' क्या है मालुमच

पडता नही.

**जांबुवंतराव** : स्मॉल मॅटर....स्मॉल मॅटर....तर दोरास्वामी रुक्मिणीला जॉनीनं विचारलं किशन कुठं गेला आहे. पुढं ?

**दोरास्वामी** : तो रुक्मिणी म्हणतो—गॉन इन—

**जांबुवंतराव** : (तत्परतेने मनकर्णिकाबाईना) म्हणजे—अंदर गया है.

**दोरास्वामी** : जॉनी विचारती—मॅडम—मे आय नो हू यू आर...

**जांबुवंतराव** : याने, बाईसाहेब—क्या मैं समझ सक्ता हूँ आप कोण है ?

**दोरास्वामी** : तर रुक्मिणी सांगतो—मॅन—रुक्मिणी सांगतो—आई ॲम हिज मिस्ट्रेस...

**जांबुवंतराव** : मिस्ट्रेस ?

**दोरास्वामी** : फ्रॉम टुडे ओन्ली....

**मनकर्णिका** : असं म्हणाली ती रुक्मिणी ?

**दोरास्वामी** : म्हणाली नाही म्हणाला—

**मनकर्णिका** : निलाजरी मेली....कोणती सभ्य घरातली बाई असं सांगेल हो ?

**दोरास्वामी** : हिंदी में....हिंदी में बोलो....

**मनकर्णिका** : हो हो—हिंदीमेंच सांगते. कौन घरेलु औरत कहानेवाली हूं की मैं एक...एक....एक...

**दोरास्वामी** : हां हां—बताइये...

**मनकर्णिका** : एक....एक...काय हो हिंदीत मिस्ट्रेसला काय म्हणतात ?

**जांबुवंतराव** : आता मला तरी काय ठाऊक ? पण मनकर्णिके, हिंदुस्थानीमें एक फार चांगली सोय आहे. म्हणजे शब्दाचा हिंदी पर्याय आठवला नाही की दाबून इंग्रजीच शब्द घुसडना—क्यूं दोरास्वामी—

**दोरास्वामी** : बिलकुल ठीक ! यासाठीच तर आम्ही म्हणतो की, इंग्लिश टेवला पाहिजे.

**मनकर्णिका** : उगाच फालतु बाते बोलू नका. मुद्दे की बात बताव. तुम्हारा जॉनी काय वाट्टेल ते बताएंगे, म्हणून काय तो म्हणेल ते आम्ही सच मानेंगे ? क्यूँ हो ?

**जांबुवंतराव** : बिलकुल ठीक. जॉनी हा कोणी धर्मराज का अवतार तो नही....?

**दोरास्वामी** : लेकिन बात ये है जकातदारसाब की ये बिल्डिंग मे हरएक आदमी—

**जांबुवंतराव :** दोरास्वामी दोरास्वामी—गल्ती करू नका—तुम्ही मराठीत.... मराठीत बोलायचं ठरलंय.

**दोरास्वामी :** आख्खी बिल्डिंग सांगतो की रुक्मिणीबरोबर तुमची किशन अक्र्स टुगेदर....

**जांबुवंतराव :** याने—तासन् तास—

**दोरास्वामी :** हां—तासं तास वोल्त उभी राहती. ते काय खोटाऽऽऽ ?

**जांबुवंतराव :** खोटा नाही. खराच. पण दोरास्वामी—किशन तिला केवळ सल्ला देत होता. सल्ला....हिंदीत ' सल्ला ' या शब्दाला काय म्हणतात ग ?

**मनकर्णिका :** ॲडव्हाइस....

**दोरास्वामी :** ॲडव्हाइस....कशाची ॲडव्हाइस ?

**जांबुवंतराव :** दोरास्वामी—तुमच्या मुलीचं आणि तिच्या नवऱ्याचं भांडण झालं होतं ना ? क्वारल ?

**दोरास्वामी :** क्वारल ? गुड हेवन्स....क्वारल व्हायला तिचं मॅरेजच झालं नाही. मी एन्क्वायरी केली आहे सगळी. यूर इन्फर्मेशन वॉज रॉंग....

**मनकर्णिका :** मराठीत....मराठीत बोला...

**दोरास्वामी :** तुमची इन्फर्मेशन रॉंग होती.

**जांबुवंतराव :** मग आता मी सांगतो ती इफर्मेशन ऐका. तुमच्या रुक्मिणीनं लग्न केलं. काल परवाच.

**दोरास्वामी :** व्हॉट द हेल डू यू टॉक ?

**जांबुवंतराव :** टेक इट इझी—टेक इट इझी—

**मनकर्णिका :** हिंदीमें या मराठी में—नो इंग्लिश—

**जांबुवंतराव :** ठीक आहे मराठी. दोरास्वामी—हळू हळू घ्या....हळू हळू घ्या...

**दोरास्वामी :** घेतो—हळू हळू घेतो...पण कोणाशी ?

**जांबुवंतराव :** रामस्वामी मुदलियार...कुलाब्याचा...

**दोरास्वामी :** ( चकित होत ) कुलाब्याचा ? रामस्वामी मुदलियार ? कुलाब्याला कोठला आला आहे रामस्वामी मुदलियार ? ( दोरास्वामीबरोबर आलेल्या लुंगीवाल्या बांधवांसमवेत स्वभाषेत ' रामस्वामी मुदलियार ' वर काही चर्चा करतात. कोणीतरी ब्रिगेडीयर मुदलियारचा उल्लेख करतो. तशी प्रचंड

विस्मयाने ) अय्यय्योऽऽ ब्रिगेडीयर रामस्वामी मुदलियार ? रुक्मिणी त्याच्याशी मॅरेज करतो ?

**जांबुवंतराव :** हां करतो करतो.

**दोरास्वामी :** आणि आम्हाला विचारीत नसतो ?

**मनकर्णिका :** पूछने के लिये आप घरमे असता है कधी ?

**दोरास्वामी :** ब्रिगेडीयर रामस्वामी मुदलियार ? माय सन–इन–लॉऽऽ ?

**जांबुवंतराव :** हां–ब्रिगेडीयर रामस्वामी मुदलियार–तुमचा सन–इन–लॉ झाला. कालपरवाच.

**दोरास्वामी :** ब्रिगेडीयर रामस्वामी आमचा सन–इन–लॉ होतो ? म्हणजे आर्मीची कँटीनचा सगळा कॉंट्रॅक्टस् आम्हालाच मिळतो...

**जांबुवंतराव :** मिळतो मिळतो.... पण तुमचा रुक्मिणी हजबंडशी भांडला नाही तर मिळतो.

**दोरास्वामी :** अय्यय्यो–रुक्मिणी नवऱ्याशी भांडलाऽऽऽ ?

**जांबुवंतराव :** मग सांगतो काय– भांडला म्हणून तर ते किशन मध्यस्थी पडलंऽऽ! हूंऽऽ !

**मनकर्णिका :** ( उसळून ) काय बडबडताहात काय तुम्ही ? ते किशन...?

**जांबुवंतराव :** अगं अगं, त्यांच्या मराठीत सांगतोय मी त्यांना समजावून....

**दोरास्वामी :** ( एकदम जांबुवंतरावांचे पाय धरीत ) तुम्ही ग्रेट आहात मिस्टर जकातदार ग्रेऽऽट...

**मनकर्णिका :** दूर हटो–आम्ही तुमच्यावर इतना उपकार करता हूं और आप हमारे लिये सुरी दाखवता हूं ?

**दोरास्वामी :** सॉरी मिसेस जकातदार– एक्स्ट्रीऽऽऽमली सॉरी. पण रुक्मिणी कुठं गेला ?

**जांबुवंतराव :** रुक्मिणी गेला रामस्वामीकडे कुलाब्याला. बघायलाच नको. किशन तिच्या—

[ पुढचे शब्द त्यांच्या तोंडातच राहतात. कारण त्याच वेळी उघड्या दारातून प्रथम दोन पोलीस येतात–तशी— ]

**मनकर्णिका :** ( घाबरून ) अगबाई पोलीऽऽस ?

**जांबुवंतराव :** घाबरू नको– रेल्वेचेच पोलीस आहेत. काय भानगड आहे ?

[ तोच किशन आणि रुक्मिणी येतात—सर्वांत शेवटी जॉनी डिक्रूस्टा—]
**मनकर्णिका :** किशा गाढवा तू...( धावत जवळ जाऊन त्याचा हात पकडीत ) काय भानगड केलीस ?
**दोरास्वामी :** ( मुलीचा हात पकडीत ) रुक्मिणी.... ( आणि स्वभाषेत तिच्यावर गुरकावीत ' रुक्मिणी कळदे, यार डी इंदु ' ' रामस्वामी मुदलियार ' असे तीन-तीनदा काही म्हणत राहतात तोच—)
**किशन :** दोरास्वामी—तुम्ही तिला काय दम भरताहात ते आम्हाला कळलं पाहिजे. मराठीत नाही तर इंग्लिशमधे नाही तर हिंदीत दम द्या.
**जॉनी :** दोरास्वामी, धिस मॅन वॉज रनिंग बाय थर्टीवन अप वुइथ युवर डॉटर.
**दोरास्वामी :** ( भडकून सुरा उचलीत ) यू बास्टर्ड—
**मनकर्णिका :** हेच का रामस्वामी मुदलियार ?
**जॉनी :** कोण रामस्वामी ? मी ? नो नो मी जॉनी डिक्रूस्टा....
**मनकर्णिका :** अरे मेल्या—तूच म्हणालास नाही का किशननं हिला ठेवलीय म्हणून.... ( टेबलावरचा एक बावटा उचलून मनकर्णिका जॉनीला मारायला धावते तशी—)
**जांबुवंतराव :** अगं अगं हे काय—
**जॉनी :** ( घाबरून माघार घेत ) नो नो—नॉट मी....नॉट मी—
**दोरास्वामी :** ( जॉनीकडे सुरा नेऊन मोहोरा करीत ) डोन्ट टेल लाय....तू तू म्हणालीस रुक्मिणीला किशन मिस्ट्रेस करते—
**जॉनी :** ( घाबरून दाराकडे मागे सरत ) मिसेस— मिस्ट्रेस नाही... मिस्टेक... मिस्टेक....
[ उघड्या दारातून जॉनी पळून जातो तशी—]
**जांबुवंतराव :** ( पोलिसांना ) बघता काय शुंभासारखे—पळा...पकडा...गिरफदार करा त्या हरामजाद्याला—
[ पोलिस बावचळल्यासारखे जॉनीमागे पळत जातात. ]
**दोरास्वामी :** टेल मी व्हेर इज हर हजबंड ?
**किशन :** हियर ओन्ली.
**मनकर्णिका :** अरे मग शहाण्या—वर घेऊन यायचं नाहीस का रामस्वामींना.

**जांबुवंतराव :** तर काय—ब्रिगेडीयर आहेत ते. ( खिडकीशी जाऊन हाक मारीत ) ब्रिगेडीयरसाहेब—अहो रामस्वामी——

**दोरास्वामी :** ( डोळे विस्फारीत ) ब्रिगेडीयर रामस्वामी इथं आली ?

**किशन :** दोरास्वामी— नो रामस्वामी—आय ॲम रुक्मिणीज स्वामी.

**मनकर्णिका :** ( किशनला चिमटा काढीत ) मेल्याऽऽ बडबडतो आहेस काय ? त्या रामस्वामीच्या बायकोला घेऊन खरंच का पळून चालला होतास तू ?

**दोरास्वामी :** ( सुरा परजीत ) आइ वील किल यू...

**किशन :** खुशाल किल— ॲंड मेक युवर डॉटर वीडो—

**जांबुवंतराव :** किशा— थापा मारू नकोस—

**किशन :** थापा नाही डॅडी.... ममी.... रुक्मिणी माझी बायको आहे.

**रुक्मिणी :** फ्रॉम टुडे ओन्ली....

**दोरास्वामी :** ( उसळून ) यू लायर—

**किशन :** आस्क युवर डॉटर....शी इज माय वाइफ....

**मनकर्णिका :** मेल्याऽऽकधी कुठं लग्न केलंस ?

**किशन :** आज दुपारी रजिस्टर कचेरीत....

**दोरास्वामी :** ( रुक्मिणीच्या गालफडात हाणीत ) माजा परमिशन न घेता—
[ रुक्मिणी रडू लागते. ]

**किशन :** ( दोरास्वामीच्या हातातील सुरा हिसकावीत ) दोरास्वामी— हॅंड आवरा— ती आता तुमची मुलगी नाही. माझी वाइफ आहे वाइफ.... अय्यय्यो रुक्मिणी डोन्ट वीप.... डोन्ट वीप हं....

**जांबुवंतराव :** माझा नाही विश्वास बसत— किशा, तू तू हिच्याशी लग्न केलंस ?

**किशन :** रजिस्ट्रारच्या ऑफिसमध्ये जाऊन खात्री करून घ्या हवी तर—

**मनकर्णिका :** पण विचारलं का नाहीस आधी आम्हाला ( पाठीत दणका घालीत ) मी मेले होते ?

**जांबुवंतराव :** आणि मी सुद्धा जिवंतच होतो ना—

**किशन :** ( पाठ चोळत ) पण सरळ विचारलं असतं तर परवानगी दिली असतीत तुम्ही ?

**मनकर्णिका :** मी मुळीच दिली नसती— चांडाळा, आपल्यात काय सुंदर मुली कमी होत्या म्हणून या जगदंबेवर हुरळलास ?

**दोरास्वामी** : हिचा मॅरेज मी सेटल देखील केली होती तर– ( स्वभाषेत 'केडगारी, इद एन्न पण्णीने नी ?' बडबडत पुन्हा मुलीला मारण्यासाठी अंगावर धावून जातो तशी– )

**किशन** : ( सुरा उगारीत किंचाळत ) स्टॉप इट. शी इज माय वाइफ.... आय विल किल यू....

**जांबुवंतराव** : हां हां– किशा हात आवर–

**मनकर्णिका** : आमचं जाऊ दे मेलं– पण स्वतःचा तरी विचार करायचा होतास ?

**किशन** : सगळा विचार केलाय मी.

**मनकर्णिका** : काय विचार केलास ? या जगदंबेची भाषा तुला तरी कळते ? काय ग सटवाई, हा म्हसोबा काय बोलतो ते तुला तरी कळतं का ? कसा संसार करणार तुम्ही दोघं ?

**जांबुवंतराव** : भाषा कळून देखील संसार धड होतोच असं नाही....

**मनकर्णिका** : ( उसळून ) काऽऽय ?

**जांबुवंतराव** : नाही नाही– म्हणजे तो काथ्याकूट आता कशाला ? आता पुढचा विचार करायला हवा. झालेलं लग्न तर काही मोडून टाकता येत नाही....

**दोरास्वामी** : पण निदान रिसेप्शन तरी ठेवाल की नाही ?

**जांबुवंतराव** : ठेवू की— पण खर्च तुमचा. शिवाय मुलाच्या आईवडिलांचं मानपान, थोडासा हुंडा, दागदागिने वगैरे वगैरे वगैरे....

**दोरास्वामी** : स्मॉल मॅटर.... स्मॉल मॅटर....

**जांबुवंतराव** : तेवढ्यानं संपलं नाही. तुमच्या सगळ्या हॉटेलांतून आम्हा सर्वांना तहहयात विनामूल्य खाण्याचा पास मिळाला पाहिजे.

**दोरास्वामी** : नाही तरी मिस्टर जकातदार, तुम्ही कॅंटीनची बिलं कधी देता ?

**जांबुवंतराव** : तसं नाही– बाय राइट.... नॉट बाय फेवर.... काय गऽऽ ?

**मनकर्णिका** : मला नका विचारू. तो मुलीवर पाघळला, तुम्ही इडली दोशावर हुरळलात. आता घरात एक दुभाषा आणून ठेवा–

**जांबुवंतराव** : दुभाषा कशाला ? जमवताना दुभाषा ठेवला होता या दोघांनी ?

**मनकर्णिका** : तेरड्याचा रंग तीन दिवस. ही दोघं भांडायला लागतील तेव्हा ?

**किशन** : ममी– तुला सांगू का–

**मनकर्णिका** : काही बोलू नकोस माझ्याशी—

**किशन :** अग ऐक तर खरं— मी रागारागानं हिला मराठीतून काय वाट्टेल त्या शिव्या घातल्या तरी हिला काय कळणार आहे ? आणि ही चिडून तामिळीतून फणफणली तरी आपली शांत वृत्ती ढळायचं मुळी काही कारणच नाही. मिळून भांडण नाहीच. फक्त आवाज ! तोही एकाचाच.

**मनकर्णिका :** तो शहाणपणा मला नको शिकवूस.

**किशन :** (लाडात येत) असं ग काय ममी—तुला एक प्रयोग करून दाखवू का ?

**जांबुवंतराव :** कसला प्रयोग करतो आहेस गाढवा—?

**किशन :** पाहा आणि ऐका,.... डॅडी.... दोरास्वामी तुम्ही देखील. (रुक्मिणी-जवळ जातो आणि प्रेमभराने तिला पाहात अत्यंत मधुर लाघवी आवाजात म्हणू लागतो—) रुक्मा—तू अगदी महामूर्ख आहेस....गाढव आहेस....तुझा तिसरा मजला पार कांदेबटाट्यांनी भरला आहे.... तुला काडीची अक्कल नाही.... पुन्हा मघासारखं रडशील भेकशील ना तर तुला काठीने बडवून काढीन.... (तिच्या गालावर टिचकी मारीत फारच लाडात येत) तुम्हा बायकांना किनई उठता लाथ नि बसता बुक्की घातली तरच—

**रुक्मिणी :** (लाजून मुरका मारीत) अय्यय्योऽऽऽ!

**किशन :** पाहिलंत ? काही कळलं का हिला ? नाही. आता ही एक गंमत पाहा. (संतापाचा अविर्भाव करीत, खच्चून ओरडून) रुक्मिणी—तुला सांगून ठेवतो—तू....तू... मला भयंकर आवडतेस, तुझ्यासाठी प्रसंगी मी प्राण देखील पणाला लावीन. तुझा रंग काळा असला म्हणून काय झालं ? तुझे भावुक टपोरे डोळे तर सुंदर आहेत ? (हातपाय आपटीत) आहेत की नाहीत ?

**रुक्मिणी :** (रागावून) वाई शाउटिंग— (असे म्हणून तडातडा तामिळीत काही वाक्ये रागारागात म्हणते ते ऐकून—)

**दोरास्वामी :** रुक्मिणी... रुक्मिणी... (तेही तिला तामिळीत समज देऊ लागतात तशी—)

**किशन :** दोरास्वामी, तुम्ही शांत राहा. मला काही कळलं नाही. त्यामुळं आपली शांतता मुळीच भंग पावली नाही. तेव्हा डॅडी— सगळं काही आवाजावर आहे. भाषेत काय आहे ?

**जांबुवंतराव :** (उठून किशनच्या पायाला वंदन करीत) इतक्या वर्षांत तूच गुरू भेटलास.

**दोरास्वामी :** ( हसत ) हे हे पटली आम्हाला.

**किशन :** पटली ना ?

**दोरास्वामी :** आम्ही तामिळी पण आमचा बायको तेलुगू....

**जांबुवंतराव :** काय म्हणता ?

**दोरास्वामी :** म्हणून तर हा रुक्मिणी काळा जाला. आमच्यासारखा उजळ आहे ?

**जांबुवंतराव :** उडदामाजी काळे गोरे....पण किशा—बेट्या, तुला हा क्रांतिकारक साक्षात्कार एकदम कसा झाला रे ?

**किशन :** एकदम नाही डॅडी— लहानपणापासून घरात रोज तुमचा आणि ममीचा तिन्ही त्रिकाळ चाललेला प्रेमळ सुखसंवाद ऐकून ऐकून वाटायला लागलं की, नवऱ्याची आणि बायकोची भाषा वेगवेगळी असेल तर घरात शांतता तरी नांदेल. म्हणजे—

**मनकर्णिका :** मेल्या—अस्सं काय ? हे सांगायचं होतं तुला ?

**किशन :** गैरसमज...ममी...गैरसमज....

**मनकर्णिका :** थांब तू काय समजलास आहेस—तिच्या समोर तुला केरसुणीनंच धोपटून काढते आणि—

[ म्हणत तरातरा केरसुणी घेऊन येण्यासाठी आत जातात. ]

**जांबुवंतराव :** किशा....पळ...पळ.. आधी...तिला घेऊन पळ.

**किशन :** पळतोच. ( रुक्मिणीचा हात धरून तिला ओढून नेत ) डॅडी गोइंग टु हनीमून.

**दोरास्वामी :** अरे पण ती रिसेप्शन...रिसेप्शन....

**जांबुवंतराव :** ते नंतर दोरास्वामी. हनीमून नंतर रिसेप्शन केलं तरी चालतं आता.

[ तेवढ्यात कॅमेरा आणि नोट बुक घेऊन एक प्रेस रिपोर्टर येतो— ]

**जांबुवंतराव :** कोण तुम्ही ?

**प्रेस रिपोर्टर :** प्रेस रिपोर्टर—तुमची इंटरव्ह्यू घेण्यासाठी आली.

**जांबुवंतराव :** तुम्ही देखील मद्रासी ?

**प्रेस रिपोर्टर :** नो नो आम्ही तेलंगी. तुमी मद्रासी वूमनशी मॅरेज केली— तेव्हा एडीटर बोलली— ही रेव्होल्यूशनरी ॲक्शन आहे. भारताचा इंटीग्रेशन होण्यासाठी यापुढे असलाच मॅरिजेस घडवून आणली पाहिजे. ( नोट बुक सरसावीत ) नाऊ टेल मी— तुमची मॅरेज तुमी कसा जुळवली ?

**जांबुवंतराव :** ( गडबडून ) अहो नाही.... तुमचा गैरसमज.... म.... म.... मॅरेज माझं नाही.... भलतंच काय ?

[ तोच केरसुणी घेऊन तरातरा मनकर्णिकाबाई येतात आणि— ]

**मनकर्णिका :** कुठाय तो ? कुठं गेला तो ? काय होऽऽ आणि हा कोण लड्डू ?

**जांबुवंतराव :** शांत हो.... मनकर्णिके, शांत हो.... हे हे....

**प्रेस रिपोर्टर :** ( कॅमेरा सरसावीत ) येच तुमचा मद्रासी वाइफ ?

**मनकर्णिका :** ( संतापाने ) जळ्ळं तुझं लक्षण ते— मला मद्राशी वाइफ म्हणतोस ? ( केरसुणीने बडवू लागते ) डोळे फुटले तुझे ? चांगली घबघबीत गोरी पान मी ....मद्राशासारखी मी दिसते तरी ?

[ रिपोर्टर ' ओय.... ओय.... ' ओरडत टेबलाभोवती पळत सुटतो. ]

**जांबुवंतराव** आणि **दोरास्वामी :** [ ' अहो जाऊ द्या.... त्याला मारू नका.... तो प्रेस रिपोर्टर आहे— ' इत्यादि ओरडत बाईंच्या मागोमाग फिरत त्यांना आवरू लागतात. या दंग्यात त्या दोघांनाही केरसुणीचे एकेक फटके खावे लागतात— हा दंगा चालला असतानाच— ]

**प डदा**

55478
16·11·76

# 'पॉप्युलर' नाटिका

## वसंत कानेटकर

गड गेला पण सिंह जागा झाला

स्मगलर सम्राटांच्या न्यायालयात रामशास्त्री

व्यासांचा कायाकल्प

**व्यासांचा कायाकल्प । गायवाडीत उतरलाय पाकिस्तानी गनीम । व्याप कुणाचा ताप कुणा?**

## गंगाधर गाडगीळ

पाच नाटिका

**बंडू ऑफिसात जातो । दोन शून्ये आणि दोन । रहस्य आणि तरुणी । जोडगोळी । बंडू चहा घेतो ।**

बंडू नाटक करतो

**बंडू नाटक करतो । बंडू उंदीर मारतो । बंडू आजारी पडतो । शेवटला रुपया । प्रेमपत्राचा घोटाळा । स्वप्नांची वजाबाकी ।**

## रत्नाकर मतकरी

एकाच मातीची खेळणी

**एकाच मातीची खेळणी । एक होती सिंड्रेला । स्वगत । सांगाती । मंत्र । अस्ताई ।**

लाल गुलाबांची भेट

**लाल गुलाबांची भेट । एका ओल्या रात्री । कथक । धर्म सोनेरी संध्याकाळ । विठोबाची लेकरे । वेडा गिरिधारी ।**

## भा. वि. वरेरकर

Library IIAS, Shimla
MR 891.462 K 131 M
00055478

चंद्रचकोरी

**चंद्रचकोरी । शुभमंगल । नव**

नवा जमाना

**नवा जमाना । ती का गेल ? । आत्महत्या ।**

पुन्हा गोकुळ

**पुन्हा गोकुळ । प्रजापति लंडन । तिच्या नवऱ्याचे माहेर ।**

**पॉप्युलर प्रकाशन**

किंमत चार रुपये

म-२६२